मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २३६ ■ शुक्रवार, ०८ मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# नांदेड येथे दै.युवक आधारची "पत्रकार संवाद बैठक" उत्साहात संपन्न

## मुख्य संपादक संतोष आमले सरांचे पत्रकारितेच्या जबाबदाऱ्यांवर मार्गदर्शन



### संघटन मजबूत करण्याचे आवाहन







**दैनिक युवक आधार**

**नांदेड जिल्हा प्रतिनिधी प्रमुख /गिरमाजी सूर्यकार :** दै. युवक आधार परिवाराच्या वतीने दिनांक २ मे २०२६ रोजी नांदेड येथील रमाई बौद्ध विहार येथे नांदेड जिल्हातील प्रतिनिधी ची पत्रकार संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत दैनिक युवक आधारचे मुख्य संपादक मा. श्री संतोष आमले सर व सहसंपादक मा. मुकुंद कांबळे सर यांच्या प्रमुख उपस्थितीत नांदेड जिल्ह्यासह लातूर जिल्ह्यातील प्रतिनिधींशी विविध विषयांवर सविस्तर संवाद साधण्यात आला. दैनिक युवक आधारला तीन वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर ही बैठक विशेष महत्त्वाची ठरली.

बैठकीच्या प्रारंभी तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले.

त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नांदेड जिल्ह्यातील पत्रकार बांधवांच्या वतीने मुख्य संपादक व संपादकीय टीमचे शाल, पुष्पहार व श्री रेणुका मातेची प्रतिमा देऊन स्वागत करण्यात आले.

संवाद बैठकीत उपस्थित पत्रकारांना मार्गदर्शन करताना मुख्य संपादक मा. संतोष आमले सर म्हणाले की, “दैनिक युवक आधार हे सर्वसामान्यांचे प्रश्न शासन दरबारी पोहोचविणारे एक प्रभावी माध्यम बनत आहे. येत्या काही दिवसांत शासनाच्या यादीत पेपरचा समावेश होणार असून त्यामध्ये महाराष्ट्रभरातील सर्व पत्रकारांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. पत्रकारिता ही केवळ बातमी देण्यापुरती मर्यादित नसून समाजाला न्याय मिळवून देण्याची मोठी जबाबदारी पत्रकारांच्या खांद्यावर आहे. पत्रकारांनी प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि निर्भीडपणे कार्य करत युवक आधार परिवाराशी एकजुटीने जोडून राहावे.”

यावेळी त्यांनी सध्याच्या पत्रकारितेसमोरील विविध आव्हाने, पत्रकारांवर वाढणारे हल्ले, समाजातील बदलती परिस्थिती, जबाबदार पत्रकारितेची गरज तसेच पत्रकारांनी पार पाडावयाच्या सामाजिक बांधिलकी यावरही सखोल भाष्य केले.

तसेच सहसंपादक मा. मुकुंद कांबळे सर यांनी तालुका व जिल्हा प्रतिनिधींच्या विविध अडचणी समजून घेत त्या सोडविण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

आगामी काळात दैनिक युवक आधारचे नेटवर्क अधिक मजबूत करण्यासाठी सर्व प्रतिनिधींनी संघटितपणे व समन्वयाने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

या संवाद बैठकीचे सूत्रसंचालन अर्धापूर तालुका प्रतिनिधी अरविंद पांचाळ यांनी केले, तर आभार प्रदर्शन नांदेड जिल्हा प्रतिनिधी प्रमुख गिरमाजी सूर्यकार यांनी केले.

या बैठकीस कोकण विभाग संपादक विजय दूंदरेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख किशोर गुडेकर, पनवेल तालुका प्रतिनिधी प्रमुख मच्छिंद्र पाटील, बीड जिल्हा प्रतिनिधी प्रमुख मारुती सत्रे, लातूर जिल्ह्यातील प्रतिनिधी, नांदेड तालुका प्रतिनिधी देविदास एगडे, लोहा तालुका प्रतिनिधी सत्यनारायण शर्मा, नांदेड दक्षिण प्रतिनिधी विनोद गगच्चे , नांदेड ग्रामीण तालुका प्रतिनिधी संभाजी सूर्यवंशी, अर्धापूर ग्रामीण तालुका प्रतिनिधी गंगाधर कदम, हिमायतनगर तालुका प्रतिनिधी माधव काईतवाड, माहूर तालुका प्रतिनिधी सय्यद खाजा, मुदखेड तालुका प्रतिनिधी प्रकाश गवारे आदी पत्रकार बांधव उपस्थित होते. पत्रकारांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे ही संवाद बैठक अत्यंत यशस्वी व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाली.

---

# खानावळे-ठोंबरेवाडी एकता संघ संचलित माथाडी व ट्रान्सपोर्ट जनरल कामगार संघटनेचे थाटात उद्घाटन



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल तालुक्यातील संघटनेचे कार्यालय गोदरेज सिटी ठोंबरेवाडी, खानावळे येथे 'महाराष्ट्र राज्य बहुउद्देशीय माथाडी व ट्रान्सपोर्ट जनरल कामगार संघटनेचे' मोठ्या उत्साहात उद्घाटन करण्यात आले.

अशोक हितेंद्र निकम (जिल्हाध्यक्ष नवी मुंबई व रायगड जिल्हा) यांच्या मार्गदर्शनाखाली खानावळे-ठोंबरेवाडी एकता संघ यांच्या वतीने या शाखेची स्थापना करण्यात आली असून उद्घाटन गोदरेजचे रचीत नेगी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी भाजप पोयंजे पंचायत समिती विभागीय अध्यक्ष मंगेश लबडे यांच्यासह किरण लबडे, दिनेश लबडे, रुपेश मांडे, संदेश मांडे, सुभाष ठोंबरे, निखिल सोनावळे, मनोज लबडे, सचिन लबडे, योगेश शिंदे, रोहित ठाकूर, प्रविण सोनावळे, स्वप्निल लबडे आदीसंह संघटनेचे पनवेल तालुका अध्यक्ष महेंद्र लबडे, जिल्हा उपाध्यक्ष नवी मुंबई व रायगड विलास ठोंबरे यांच्यासह मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.



**पाटोदा :- राहुल देशमुख यांचे चिरंजीव अंशुल देशमुख याचा उपनयन संस्कार सोहळा कार्यक्रमाला उपस्थित राहून शुभेच्छा देताना. आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पञकार संघाचे अध्यक्ष श्री.सोमीनाथ कोल्हे, पत्रकार ॲड.महेश बेदरे सह इतर**

**(छाया - दैनिक युवक आधार पाटोदा.)**

---

# पनवेल महानगरपालिकेच्या क्रिकेट थीम शिल्पाचे नागरिकांकडून कौतुक







**दैनिक युवक आधार**

**दिपक कोळवणकर**

**पनवेल :** पनवेल महानगरपालिकेतर्फे आदई सर्कल येथे उभारण्यात आलेले क्रिकेटशी संबंधित भव्य व आकर्षक शिल्प हे अत्यंत कौतुकास्पद व अभिनव काम ठरत आहे. पनवेल शहरातील हा पहिलाच असा अनोखा प्रयोग असून नागरिकांकडून त्याचे मोठ्या प्रमाणावर स्वागत होत आहे.या आकर्षक शिल्पामध्ये सुमारे सहा फूट उंचीचे स्टंप, सहा फूटाची क्रिकेट बॅट, अडीच फूटाचा क्रिकेट बॉल तसेच दीड ते दोन फूट आकाराचे ग्लोज, शूज, हेल्मेट आदी क्रिकेट साहित्य अत्यंत सुंदर व कलात्मक पद्धतीने साकारण्यात आले आहे. या शिल्पामुळे परिसराचे सौंदर्य मोठ्या प्रमाणात वाढले असून नागरिकांना व क्रिकेटप्रेमींना विशेष आकर्षण वाटत आहे.पनवेल महानगरपालिकेचा हा उपक्रम शहराच्या सुशोभीकरणासाठी एक सकारात्मक पाऊल मानले जात आहे. अशा प्रकारची थीम आधारित वाहतूक बेटे, शिल्पे व कलात्मक रचना शहरातील विविध भागांमध्ये उभारण्यात आल्यास पनवेल शहर अधिक सुंदर, आधुनिक व पर्यटनदृष्ट्याही आकर्षक बनेल. विशेषतः क्रीडा, संस्कृती, पर्यावरण, महाराष्ट्राची परंपरा, विज्ञान तसेच ऐतिहासिक विषयांवर आधारित शिल्पे उभारल्यास नागरिकांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल.पनवेल महानगरपालिकेने राबविलेल्या या सुंदर व नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन व्यक्त करण्यात येत असून भविष्यातही अशाच कलात्मक व लोकाभिमुख प्रकल्पांची संख्या वाढवावी, अशी नागरिकांकडून अपेक्षा व्यक्त होत आहे.

---

### रामनगरमधील खचलेल्या गटाराचे काम अखेर सुरू

# मनपा एन विभाग प्रभाग समिती अध्यक्षा अश्विनी मते यांच्या प्रयत्नाने कामाला सुरुवात



**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(प्रतिनिधी)** : पश्चिमेकडील रामनगर(अ) शंकर मंदिराशेजारील पाण्याच्या टाकीमागील मुख्य गटार खचल्याने याठिकाणी धोकादायक परिस्थिती निर्माण झाली होती.त्यानंतर तत्काळ स्थानिक सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांनी याबाबत मनपा एन विभाग सहाय्यक आयुक्त तसेच प्रभाग समिती अध्यक्षा-एन विभाग यांना पत्र लिहून पावसाळ्यापूर्वी या खचलेल्या गटाराच्या कामाला सुरुवात करण्याची विनंती केली होती.त्यानंतर मनपा एन विभाग प्रभाग समिती अध्यक्षा अश्विनी मते यांनी केतन भोज यांच्या पत्राची तत्काळ दखल घेत,संबंधित मनपा एन विभाग प्रशासनाला लगेचच या खचलेल्या गटाराच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्याच्या सूचना दिल्या.अखेर तातडीने मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त निधीतून तसेच मनपा एन विभाग प्रभाग समिती अध्यक्षा अश्विनी मते यांच्या पुढाकाराने व प्रयत्नाने या मुख्य नाल्याच्या दुरुस्तीच्या बांधकामाला सुरुवात करण्यात आली आहे.तसेच याबाबत सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांच्यासोबतच या कामाचा पाठपुरावा प्रशांत मुके व ॲड.करण इंगवले हे देखील करत होते.तरी स्थानिक नागरिकांनी तसेच व्यापारी वर्गाणी या खचलेल्या गटाराच्या दुरुस्तीच्या बांधकामाला सुरुवात झाल्यामुळे समाधान व्यक्त केले आहे.

# सिने अभिनेत्री खुशी शिंदेकडून नसरापूरच्या अमानुष घटनेचा जाहीर निषेध

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : भोर तालुक्यातील नसरापूर येथे घडलेली अमानुष घटना संपूर्ण समाजाला हादरवून सोडणारी ठरली आहे.एका ६० वर्षीय वासनांध पुरुषाने चार वर्षांच्या निरागस बालिकेवर अत्याचार करून तिचा निर्दयपणे खून केला आणि मृतदेह गोट्यातील शेणाच्या ढिगाऱ्याखाली टाकून माणुसकीलाच काळिमा फासला.या घटनेने संपूर्ण पुणे जिल्हा आणि राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे.

या घटनेचा सिनेअभिनेत्री खुशी शिंदे यांनी तीव्र शब्दांत जाहीर निषेध केला आहे. आमच्या प्रतिनिधींशी दूरध्वनीवर बोलताना त्यांनी सांगितले की, "नसरापूरमध्ये घडलेली ही घटना समाजासाठी फार दुःखदायक आहे.एका लहानग्या बालिकेवर असा अमानुष अत्याचार होणे हे माणुसकीच्या अस्तित्वालाच प्रश्नचिन्ह लावणारे आहे. सरकारने अशा गुन्हेगारांना कठोरात कठोर शिक्षा देऊन समाजात भीती निर्माण करावी." खुशी शिंदे यांनी सरकारच्या कामगिरीवरही प्रश्न उपस्थित करत सांगितले की,अशा घटना वारंवार घडत असताना प्रशासनाने ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे.त्यांनी समाजातील सर्व घटकांना एकत्र येऊन बालकांच्या सुरक्षेसाठी आवाज उठवण्याचे आवाहन केले. नसरापूरच्या या घटनेने प्रत्येक संवेदनशील नागरिकाच्या मनात वेदना निर्माण केल्या आहेत. निरागस बालिकेच्या मृत्यूने समाजातील माणुसकीला काळिमा फासला असून,या घटनेचा निषेध करताना अभिनेत्री खुशी शिंदे यांनी व्यक्त केलेले दुःख हे संपूर्ण समाजाच्या भावनांचे प्रतिनिधित्व करते.

# सर्व्हर डाऊन, नागरिकांना दाखले मिळेना

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : तहसील सेतू कार्यालयाच्या कारभाराबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. वारस दाखला, उत्पन्न दाखला व इतर महत्त्वाचे दाखले मिळण्यासाठी विद्यार्थ्यांना व पालकांना महिनाभर प्रतीक्षा करावी लागत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. शासनाच्या नियमानुसार सात ते दहा दिवसांत काही दाखले देणे बंधनकारक असताना पनवेलमध्ये मात्र वीस दिवसांनंतरही दाखले मिळत असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. सर्वर डाऊन असल्यामुळे हे परिस्थिती ओढवले असल्याचे बोलले जात आहे.नागरिकांच्या मते, गेल्या १५ दिवसांपासून सेतू कार्यालयाचे पोर्टल बंद असल्याचे सांगितले जात आहे. अर्जदारांना "तुम्हाला मोबाईलवर मेसेज येईल" असे सांगून वारंवार परत पाठवले जात असल्याने विद्यार्थी व पालकांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषतः प्रवेश प्रक्रिया व शैक्षणिक कामांसाठी दाखल्यांची तातडीची गरज असताना होणारा हा विलंब विद्यार्थ्यांसाठी अडचणीचा ठरत आहे. दरम्यान, काही नागरिकांनी गंभीर आरोप करत म्हटले आहे की, दलालामार्फत अर्ज केल्यास हेच दाखले तीन ते चार दिवसांत मिळत आहेत. तसेच येथील सेतू कार्यालयातील कर्मचारी महिला नागरिकांशी उर्मट भाषा वापरत वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटा तुमचे दाखले असून 15 ते 20 दिवसांनी भेटलीस असे उत्तर देत आहे. त्यामुळे कार्यालयातील पारदर्शकतेबाबत शंका निर्माण होत असून यामागे गैरप्रकार होत असल्याची चर्चा सुरू आहे.या सर्व पार्श्वभूमीवर संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देऊन पोर्टल सुरू करावे, प्रलंबित दाखले लवकरात लवकर वितरित करावेत आणि दलालांच्या हस्तक्षेपाला आळा घालावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# श्रीचक्रधर स्वामींनी महाराष्ट्र धर्म जपला- संदीप तडस

## महाराष्ट्र दिनानिमित्त 'महाराष्ट्री असावे' विषयावर विशेष व्याख्यान

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील भगवान श्री चक्रधर स्वामी अध्यासनाच्या वतीने महाराष्ट्र दिनानिमित्त 'महाराष्ट्री असावे' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. गांधी भवन, एल.ए.डी. चौक, नागपूर येथील गांधीभवन सभागृहात उत्साहात व्याख्यान पार पडले. माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भगवान श्री चक्रधर स्वामी अध्यासन प्रमुख डॉ.भारतभूषण शास्त्री यांनी भूषविले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अमरावती येथील महानुभाव साहित्याचे अभ्यासक प्रा. संदीप तडस, विशेष उपस्थिती म्हणून प.पु.प.म. कृष्णराज बाबा गुर्जर याची उपस्थिती होती. यावेळी



अमरावती येथील महानुभाव साहित्याचे अभ्यासक प्रा. संदीप तडस यांनी मुख्य व्याख्यान देताना 'महाराष्ट्री असावे' या सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या सूत्राचा ऐतिहासिक, सांस्कृतिक व सामाजिक संदर्भ स्पष्ट केला. 'महाराष्ट्री असावे' हे सूत्र सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींनी निरूपण केले. त्यामुळे आज सुद्धा पंजाब, आंध्र प्रदेश, हरियाणा येथील महानुभावी मंडळी शेवटच्या उत्तरार्धाकाळात महाराष्ट्रात येऊन आपले जीवन व्यतित करतात. महाराष्ट्र ही सात्विक भूमी असून इथले अन्न, पाणी, औषधी हे सुद्धा सात्विक स्वरूपाचे आहे, असे महानुभावीय भाष्यकारांचे मत असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. भारतभूषण शास्त्री यांनी 'महंत राष्ट्र म्हणूनी महाराष्ट्र' या संकल्पनेचा विस्तार केला. श्रीचक्रधर स्वामींनी महाराष्ट्र आणि मराठी या दोन्ही घटकाला विशेष महत्त्व दिले आहे. पुढे तोच आदर्श ठेवत आचार्य नागदेव यांनी सुद्धा मराठी भाषेला विशेष महत्त्व दिले. महानुभावीय कवी आणि आचार्यांनी महाराष्ट्राच्या तत्कालीन सीमारेषा अधोरेखित केलेल्या आहेत. त्याचे विविध पुरावे ग्रंथ स्वरूपात उपलब्ध आहेत.त्यामुळे महाराष्ट्राचे संपूर्ण चित्र महानुभावीय साहित्यातून दिसून येते. असे मत त्यांनी व्यक्त केले. विशेष उपस्थिती म्हणून लाभलेले प.पु.प.म. कृष्णराज बाबा गुर्जर यांनीमहाराष्ट्राला सात्विक रूप देण्यास महानुभावांचा आचारधर्म अत्यंत महत्त्वाचा आहे. सात्विक आचरणामुळे महाराष्ट्राला विशिष्ट उंचीवर नेण्याचे काम महानुभाव संप्रदायाने केले, असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाला 'महानुभाव विशारद' अभ्यासक्रमाच्या अभ्यासकांची लक्षणीय उपस्थिती होती. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र दिनानिमित्त आपली मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता शहाणे यांनी केले.

# स्कायरूट एअरोस्पेसने 60 दशलक्ष डॉलर्स उभारले

## 1.1 अब्ज डॉलर्सचे मूल्यांकन असलेली युनिकॉर्न कंपनी ठरली स्काय रूट एअरोस्पेस

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले मुंबई** : भारतातील अग्रगण्य खासगी अवकाश प्रक्षेपण कंपनी, स्कायरूट एअरोस्पेसने, आज 1.1 अब्ज डॉलर्सच्या प्री-मनी व्हॅल्युएशन वर जवळपास 60 दशलक्ष डॉलर्स उभारण्याची घोषणा केली, यामुळे ती एक युनिकॉर्न कंपनी बनली आहे. शेरपालो व्हेंचर्स आणि जीआयसी यांच्या संयुक्त नेतृत्वाखालील इक्विटी राउंड, त्यामध्ये ब्लॅकरॉक द्वारे व्यवस्थापित फंड्स, ग्रीन-को ग्रुपचे संस्थापक, अर्कम व्हेंचर्स, प्लेबूक पार्टनर्स, संघवी फॅमिली ऑफिस आणि इतर गुंतवणूकदारांचा सहभाग आहे. स्काय रूटच्या विक्रम-1 रॉकेटच्या पहिल्या उड्डाणापूर्वी व्यावसायिक प्रक्षेपण कार्यांना गती देण्यासाठी हा निधी उपलब्ध असेल.



शेरपालो व्हेंचर्स आणि जागतिक संस्थात्मक गुंतवणूकदार जीआयसी (GIC) यांनी संयुक्तपणे या निधी उभारणीच्या राउंडचे नेतृत्व केले, तसेच ग्रीनको ग्रुप आणि अर्कम व्हेंचर्सच्या संस्थापकांसह स्कायरूटच्या इतर विद्यमान गुंतवणूकदारांचाही यात सहभाग होता. शेरपालोचे संस्थापक, राम श्रीराम, जे स्वतः एक प्रसिद्ध टेक गुंतवणूकदार आणि अल्फाबेट इंकचे बोर्ड सदस्य आहेत, ते स्कायरूटच्या संचालक मंडळात सहभागी होतील.या भांडवल उभारणीमध्ये जगातील सर्वात मोठी मालमत्ता व्यवस्थापन कंपनी असलेल्या ब्लॅकरॉक, टेक ग्रोथ कॅपिटल फर्म प्लेबूक पार्टनर्स, संघवी फॅमिली ऑफिस आणि इतरां द्वारे व्यवस्थापित निधीचाही समावेश आहे.

पवन कुमार चंदना, सह-संस्थापक-मुख्य कार्यकारी अधिकारी, स्कायरूट एअरोस्पेस,''आगामी विक्रम-1 प्रक्षेपणाबाबत आम्ही अत्यंत उत्साहित आहोत. हे प्रक्षेपण म्हणजे भारताचे पहिले खासगी ऑर्बिटल रॉकेट असून, ते भारत आणि जागतिक अंतराळ क्षेत्रासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरते आहे. ही गुंतवणूक जगातील काही अत्यंत प्रतिष्ठित गुंतवणूकदारांचा स्कायरूट वरील विश्वास दर्शवते."

जगातील अग्रगण्य अवकाश प्रक्षेपण सेवा प्रदात्यांपैकी एक बनण्याच्या स्कायरूटच्या वाटचालीवर गुंतवणूकदारांचा असलेला दृढ विश्वास ही नवीन निधी उभारणी दर्शवते. या नवीन भांडवलामुळे विक्रम-1 च्या प्रक्षेपणात वाढ करणे, उत्पादन वाढवणे आणि विक्रम-2 (प्रगत क्रायोजेनिक स्टेज द्वारे चालणारे 1-टन श्रेणीतील प्रक्षेपण यान) विकसित करणे स्कायरूटला शक्य होईल, ज्यामुळे त्यांच्या मोहिमांची व्याप्ती वाढण्यासोबतच आणि ग्राहकांची संख्या देखील वाढेल.

राम श्रीराम, संस्थापक-व्यवस्थापकीय भागीदार, शेरपालो व्हेंचर्स,''मी सुरुवातीपासून स्काय रूट टीमवर विश्वास ठेवला आहे. आणि भारताचे पहिले खासगी ऑर्बिटल-क्लास रॉकेट, विक्रम-1, घेऊन ही टीम प्रक्षेपण स्थळाकडे वाटचाल करत असताना माझा तो विश्वास अधिकच दृढ झाला आहे. अंतराळात प्रवेश करणे हे आपल्या काळात असलेल्या प्रमुख आव्हानांपैकी एक आहे. ऑर्बिटल-लाँच उद्योगातील सर्वोत्तम खर्च-कार्यक्षमता गुणोत्तरासह स्कायरूट भविष्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करते आहे, आणि या टीमने जे साध्य केले आहे ते उल्लेखनीय आहे. ते त्यांचे पुढील मोठे लक्ष्य साध्य करत असताना, त्यांच्यासोबतची माझी भागीदारी अधिक दृढ करताना मला अभिमान वाटतो."

भारताचे पहिले खासगीरित्या विकसित ऑर्बिटल रॉकेट, विक्रम-1, त्याच्या पहिल्या उड्डाणासाठी स्कायरूट सज्ज होत असतानाच या इक्विटी राउंडची घोषणा करण्यात आली. या घोषणेनंतरच्या काही आठवड्यातच प्रक्षेपणाचे लक्ष्य असलेले विक्रम-1, जागतिक उपग्रह ऑपरेटर्सना अवकाशात गरजेनुसार बदल करता येण्याजोगी सुविधा देण्यासाठी तयार करण्यात आले आहे. ही आगामी मोहीम स्कायरूटच्या 2022च्या ऐतिहासिक मोहिमेवर आधारित आहे जेव्हा त्यांनी भारताचे पहिले खासगीरित्या तयार केलेले रॉकेट, विक्रम-एस, प्रक्षेपित केले होते.

# "कोकणचा वाघ विस्मृतीत ; अंतुले साहेबांच्या उपेक्षेवर ; रायगडकरांचा संताप"

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांच्या कार्याचा आणि योगदानाचा विसर पडत चालल्याची भावना रायगड जिल्ह्यात तीव्र होत असून, त्यांच्या स्मृतींच्या उपेक्षेमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

रायगड जिल्ह्याचे सुपुत्र असलेल्या अंतुले साहेबांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात अनेक ऐतिहासिक निर्णय घेत राज्याच्या विकासाला दिशा दिली. मंत्रालयाच्या प्रवेशद्वारावर छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा लावून त्यांनी राज्याच्या अस्मितेला अभिमानाची जोड दिली. तसेच 'कुलाबा' जिल्ह्याचे 'रायगड' असे नामकरण करून जिल्ह्याच्या ओळखीला नवे स्वरूप दिले.

एकेकाळी काँग्रेस पक्षाचे प्रमुख नेते म्हणून ओळख असलेल्या अंतुले साहेबांकडे आज त्याच पक्षाकडून अपेक्षित दखल घेतली जात नसल्याची चर्चा रंगत आहे. विशेष म्हणजे, त्यांच्या मार्गदर्शनाखाली राजकारणात आलेले अनेक नेते आज उच्च पदांवर असतानाही त्यांच्या कार्याचा सन्मान करत नसल्याची खंत नागरिक व्यक्त करत आहेत. इतर राजकीय पक्ष व समाजातील विविध घटकांकडूनही या विषयाकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना आहे.

अंतुले साहेबांच्या जन्मगाव आंबेत येथील परिस्थिती सध्या चिंताजनक असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. त्यांच्या समाधी परिसराकडे दुर्लक्ष होत असून, रस्त्यांची दुरवस्था



आणि मूलभूत सुविधांचा अभाव यामुळे नागरिकांमध्ये असंतोष वाढत आहे.

रायगड जिल्ह्यातील एकमेव मुख्यमंत्री म्हणून अंतुले साहेबांनी जिल्ह्याच्या विकासासाठी अनेक महत्त्वाचे प्रकल्प आणले. त्यांच्या प्रयत्नांमुळे हजारो स्थानिकांना रोजगार मिळाला आणि कोकणाच्या विकासाला वेग मिळाला, अशी भावना आजही नागरिकांमध्ये आहे.

नागरिकांचा असा विश्वास आहे की, अंतुले साहेब आज हयात असते तर द्रोणागिरी नोडमध्ये मंत्रालय आणण्याचे स्वप्न साकारले गेले असते आणि रायगड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास झाला असता.

या पार्श्वभूमीवर, अंतुले साहेबांच्या स्मृती जपण्यासाठी आंबेत येथे भव्य स्मारक उभारणे, त्यांच्या नावाने शैक्षणिक व आरोग्यविषयक योजना सुरू करणे, तसेच समाधी परिसराचे सुशोभीकरण व रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करणे, या मागण्या नागरिकांकडून जोर धरत आहेत. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे

# जिल्हा परिषद हायस्कूल, मालेगाव (बॅच २००७) चा माजी विद्यार्थी स्नेह मेळावा उत्साहात साजरा"

**दैनिक युवक आधार**

**गंगाधर कदम अर्धापूर ग्रामीण तालुका प्रतिनिधी** : जिल्हा परिषद हायस्कूल, मालेगाव, तालुका अर्धापूर जिल्हा नांदेड येथील २००७ बॅचचा माजी विद्यार्थी स्नेह मेळावा अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात दिमाखात संपन्न झाला.




अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत आनंदाचा अविस्मरणीय क्षण अनुभवला.या स्नेहमेळाव्याला आदरणीय शिवा कांबळे सर, फटाले सर, दापकेकर सर, देलमडे सर, आवटे सर, कदम सर तसेच पांढरे मॅडम, चौधरी मॅडम, नांदडे मॅडम, आलेवार मॅडम आणि डोमकोंडवाड मॅडम यांची मान्यवर उपस्थिती लाभली. गुरुजनांच्या सहवासामुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच खुलून आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज शिंदे यांनी अत्यंत सुरेख व प्रभावी शैलीत केले, तर आभारप्रदर्शन मुंजाजी साबळे यांनी मनोगतपूर्ण शब्दांत व्यक्त केले. यावेळी विद्यार्थ्यांच्या हस्ते सर्व गुरुजनांचा सत्कार करण्यात आला, ज्यातून कृतज्ञतेची भावना व्यक्त झाली.

तसेच उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना सुंदर भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. विशेष म्हणजे, बॅचमधील विद्यार्थ्यांसह विद्यार्थिनींचीही लक्षणीय उपस्थिती होती, ज्यामुळे कार्यक्रमाला एक वेगळीच उंची प्राप्त झाली.या प्रसंगी सर्वांनी आपल्या सध्याच्या कार्यक्षेत्राची माहिती देत भूतकाळातील आठवणींना उजाळा दिला. अनेक वर्षांनंतर झालेल्या या भेटीत मैत्रीचे बंध अधिक दृढ झाले आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.हा स्नेह मेळावा केवळ एक कार्यक्रम न ठरता, आयुष्यभर जपावी अशी एक गोड आणि अविस्मरणीय आठवण ठरली.

# उरण तालुका बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड. किशोर धनाजी ठाकूर

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** उरण तालुका बार असोसिएशनच्या सन 2026-2028 या कार्यकाळासाठी झालेल्या निवडणुकीत ॲड. किशोर धनाजी ठाकूर यांची अध्यक्षपदी निवड झाली आहे. जेष्ठ विधीज्ञ ॲड. प्रमोद महादेव ठाकूर यांचे शिष्य असलेल्या ॲड. ठाकूर यांनी 114 मते मिळवत दणदणीत विजय संपादन केला.

ही निवडणूक 29 एप्रिल 2026 रोजी पार पडली. एकूण 199 वकिलांनी मतदानाचा हक्क बजावला. अध्यक्षपदासाठी ॲड. निनाद नाईक यांना 83 मते, तर ॲड. दत्तात्रेय नवाळे यांना1 मत मिळाले.1 मत नोटाला मिळाले.

उपाध्यक्षपदासाठी ॲड. योगेश म्हात्रे (104मते) विजयी



झाले, तर ॲड. अमर पाटील यांना92 मते मिळाली. महिला उपाध्यक्षपदी ॲड. प्राची जोशी (102 मते) निवडून आल्या. ॲड. भारती भोईर (74मते) व ॲड. वृशाली पाटील (15 मते) यांना अनुक्रमे मते मिळाली.

सचिवपदी ॲड. रोशनी बारे (103 मते) विजयी झाल्या, तर ॲड. धीरज डाकी यांना ८८ मते मिळाली. सहसचिवपदी ॲड. प्रज्ञा सरवणकर (96मते) यांनी ॲड. संतोष पाटील (95 मते) यांचा अल्प फरकाने पराभव केला. या पदासाठी नोटाला 8मते मिळाली. खजिनदारपदी ॲड. किशोर पाटील (105 मते) विजयी झाले, तर ॲड. अर्चना माळी यांना 88 मते मिळाली.

सभासद पदासाठी ॲड. केवळ गावंड (108 मते), ॲड. जितेंद्र कातरणे (106 मते) व ॲड. मच्छिंद्र घरत (96 मते) विजयी झाले. या पदासाठी नोटाला 67 मते मिळाली.

लेखापाल पदासाठी ॲड. शहजाद पठाण यांची बिनविरोध निवड झाली. तसेच महिला सभासद राखीव पदासाठी ॲड. सोनम ठाकूर व ॲड. दक्षता पराडकर यांचीही बिनविरोध निवड करण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. संपदा मोकल व ॲड. अपूर्वा ठाकूर यांनी निवडणूक प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली. निवडणूक प्रतिनिधी म्हणून ॲड. भार्गव पाटील, ॲड. गोविंदा घरत, ॲड. अभिषेक म्हात्रे व ॲड. रोहन म्हात्रे यांनी सहकार्य केले.

नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. किशोर ठाकूर व त्यांच्या कार्यकारिणीचे विविध मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# अजिंठा घाटातील जबरी चोरीचा ४ तासांत छडा; दोन आरोपी जेरबंद

## अजिंठा पोलिसांची कामगिरी; शस्त्राने जखमी करून १.२० लाख लुटणारे सोयगावमधून जेरबंद

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख छत्रपती संभाजीनगर :** अजिंठा घाटातील घोडा मैदान परिसरात एका व्यावसायिकाला अडवून, शस्त्राने जखमी करत १ लाख २० हजार रुपयांची रोकड लुटणाऱ्या दोन अट्टल गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यात अजिंठा पोलिसांना अवघ्या चार तासांत यश आले आहे. तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी सोयगाव परिसरातून या संशयितांना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी शेख युसुफ शेख लुखमान (वय ४९, व्यवसाय-भंगार खरेदी-विक्री, रा. स्नेहनगर, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर) हे ५ मे २०२६ रोजी दुपारी ३:३० च्या सुमारास हिवर सोयगाव येथून आपल्या दुचाकीवरून (क्रमांक एमएच-२० एचपी ७५०९) सिल्लोडकडे जात होते. अजिंठा घाटातील घोडा मैदान परिसरात दोन अज्ञात इसमांनी तोंडाला रुमाल बांधून त्यांचा पाठलाग केला व त्यांना गाठले. आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करत रस्त्याच्या कडेला ओढून नेले. तिथे त्यांना चापट-बुक्यांनी मारहाण करून त्यांचा मोबाईल फोडून टाकला. त्यानंतर आरोपींनी दगडाने व लोखंडी हत्याराने फिर्यादीच्या डोक्यावर आणि छातीवर वार करून त्यांना गंभीर जखमी केले व त्यांच्याकडील १ लाख २० हजार रुपयांची रोख रक्कम जबरदस्तीने हिसकावून पळ काढला.

घटनेची माहिती मिळताच अजिंठा पोलिसांनी गोपनीयरीत्या तपासाची चक्रे फिरवली. प्रभारी अधिकारी स.पो.नि. अमोल ढाकणे यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तातडीने दोन विशेष तपास पथके तैनात केली. तांत्रिक विश्लेषण आणि खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी सोयगाव परिसरात असल्याची खात्री पटताच पोलिसांनी तेथे सापळा रचला आणि गुन्हा घडल्यानंतर अवघ्या ४ तासांच्या आत आरोपींना जेरबंद केले. आरोपींनी चौकशीत गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांच्याकडून मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

याप्रकरणी अजिंठा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ च्या कलम ३०९(६), ३२४(२), २९६ आणि ३(५) अन्वये गुन्हा (गु.र.नं. ९७/२०२६) दाखल करण्यात आला आहे . ही धाडसी कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. विनय कुमार राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिनेश कुमार कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. अमोल ढाकणे, पो.उपनिरीक्षक धम्मदीप काकडे, हवालदार संतोष पाईकराव, दिलीप तडवी, कृष्णा ढाकरे, जमील तडवी, तसेच पोलीस अंमलदार रवींद्र बागुलकर आणि संजय कोळी यांच्या पथकाने यशस्वी केली आहे.

# नागपूर शहर पोलीसांच्या समर कॅम्पला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातर्फे पोलीस आयुक्त Dr. Ravinder Kumar Singal (डॉ. रवींद्रकुमार सिंगल) यांच्या संकल्पनेतून व प्रेरणेतून आयोजित करण्यात आलेल्या समर कॅम्पला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न या कॅम्पमधून केला जात आहे.

या समर कॅम्पमध्ये ४ ते ७ वर्षे आणि ८ ते १४ वर्षे अशा दोन गटांमध्ये एकूण १३३ विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविण्यात आला आहे. मुलांसाठी विविध इनडोअर आणि आउटडोअर ॲक्टिव्हिटी आयोजित करण्यात येत असून या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, आत्मविश्वास, संघभावना, नेतृत्वगुण तसेच नवीन कौशल्यांचा विकास होत आहे. तसेच नवीन मित्र मिळाल्याने सामाजिक संवाद वाढण्यासही मदत होत आहे.

आज मुलांसाठी टर्फ ग्राउंडवर अनुभवी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली Cricket, Pickleball आणि Dodgeball या आउटडोअर खेळांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेत नवीन खेळांचा अनुभव घेतला आणि भरभरून आनंद लुटला.

समर कॅम्पमध्ये खेळांसोबतच मुलांच्या मानसिक, बौद्धिक आणि सर्जनशील विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, सहकार्याची भावना आणि सकारात्मक विचारसरणी विकसित करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे.

नागपूर शहर पोलीसांच्या या अभिनव उपक्रमामुळे मुलांच्या उन्हाळी सुट्टीचा वेळ आनंददायी, सुरक्षित आणि कौशल्यविकासासाठी उपयुक्त ठरत असून पालकांकडूनही या समर कॅम्पचे कौतुक करण्यात येत आहे.



**थोर समाजसुधारक स्वर्गीय जनार्दन भगत साहेब यांच्या 38 व्या पुण्यतिथीनिमित्त गुरुवार दिनांक 07 मे रोजी सायंकाळी 06 वाजता श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक कार्यक्रमासंदर्भातील अंतिम नियोजन आढावा बैठक आज (बुधवारी) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीस प्रमुख मान्यवर म्हणून ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, महापौर नितीन पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, दिबांचे चिरंजीव अतुल पाटील, मंडळाचे सचिव नगरसेवक परेश ठाकूर, संस्थेचे सचिव एस.टी. गडदे, संचालक अनिल भगत, संजय भगत, भाऊशेठ पाटील, वसंत पाटील, ज्येष्ठ नेते जयंत पगडे, पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, विकास घरत, जिल्हा परिषद सदस्या निकिता खारकर, पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी, वितेश म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, मयुरेश नेतकर, यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

**( दैनिक युवक आधार )**

# नरसापुर येथील अत्याचार व खून प्रकरणी आरोपीस कठोर शिक्षेची मागणी

## सकल ब्राह्मण समाजाचे निफाड पोलिसांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** पुणे जिल्ह्यातील नरसापुर येथे चिमुकल्या मुलीवर झालेल्या बलात्कार व निर्घृण खून प्रकरणातील संशयित आरोपीस कठोरात कठोर शिक्षा देण्यात यावी अशा आशयाचे निवेदन सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांना देण्यात आले.



यावेळी समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला. “निष्पाप चिमुकल्या मुलीवर झालेला अत्याचार हा अत्यंत संतापजनक असून अशा विकृत मानसिकतेच्या नराधमांना समाजात स्थान नाही. समाजातील अशा प्रवृत्ती वेळेत ओळखून त्यांच्यावर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे,” असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नरसापुर येथील ही घटना अत्यंत भीषण असून तिने संपूर्ण समाजमन हादरून गेले आहे. महाराष्ट्र शासन, पोलीस प्रशासन आणि न्यायव्यवस्थेवर आमचा पूर्ण विश्वास असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. तसेच पीडित मुलीच्या कुटुंबियांच्या पाठीशी सकल ब्राह्मण समाज ठामपणे उभा असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. या प्रकरणातील संशयित आरोपीला फास्ट ट्रॅक न्यायालयामार्फत कठोरातील कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# तब्बल नऊ तास वीज ग्राहक अंधारात, हजारो नागरिकांना फटका

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** बुधवार सहा मे रोजी रात्री पावणे नऊ वाजता गायब झालेली वीज तब्बल नऊ तासानंतर पहाटे पावणे सहाच्या दरम्यान आली. त्यामुळे हजारो वीज ग्राहकांना तब्बल नऊ तास अंधारात राहावे लागले.आकुर्ली-सुकापूर येथे महानगर गॅसच्या कामादरम्यान झालेल्या नुकसानीमुळे २२ केव्ही नेरे मेन एचटी केबलमध्ये बिघाड झाला. मात्र वीजपुरवठा सुरू करण्यासाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध नव्हती. संपूर्ण परिसरातील वीजपुरवठा पूर्ववत होण्यासाठी सुमारे 9 तासांचा कालावधी लागला. रात्री पावणे नऊ वाजता गेलेली वीज पहाटे पावणे सहा वाजता आली. त्यामुळे रात्रभर वीज ग्राहकांना अंधारात राहावे लागले. संपूर्ण रात्रभर विद्युत कर्मचारी वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करत होते. अचानक गेलेल्या विजेमुळे महावितरणचे कर्मचारी, अधिकारी यांना देखील रात्रभर जागावे लागले. महानगर गॅस कंपनीच्या खोदकामात निष्काळजीपणा केल्यामुळे वीज वाहिनी तुटली आणि ऐन उन्हाळ्यात नऊ तास बत्ती गुल झाली. त्यामुळे नागरिकांना रात्री अंधारात बसावे लागले. त्यानंतर महावितरणचे अधिकारी, कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी वीज वाहिनी दुरुस्ती करण्याचे काम सुरू केले. पहाटे पावणे सहाच्या दरम्यान त्यांनी हे काम पूर्ण केले. मात्र तब्बल नऊ तास वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे असंख्य ग्राहकांना आबाल वृद्धांना, मुलांना नाहक त्रास सहन करावा लागला. विज पुरवठा खंडित झाल्यामुळे तब्बल 100 पेक्षा गाव-वाड्यांना अंधाराचा सामना करावा लागला. या प्रकरणी कारवाई करणार असल्याचे महावितरणच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# बालमोहन परिवारावर शोककळा : क्रीडा शिक्षक विवेक अटाळे सरांचे निधन

**दैनिक युवक आधार**

**मयूर धुरी, मुंबई प्रतिनिधी :** दादर येथील बालमोहन विद्यालयाचे माजी क्रीडा शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे अत्यंत लाडके मार्गदर्शक श्री. विवेक मधुकर अटाळे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाच्या बातमीने बालमोहनच्या आजी-माजी विद्यार्थ्यांसह शिक्षकवर्ग आणि क्रीडाप्रेमींमध्ये शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अटाळे सर अलिबागहून पेणकडे कारने प्रवास करत असताना त्यांना अचानक हृदयविकाराचा झटका आला. उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. पेण येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

अटाळे सरांनी अनेक वर्षे बालमोहन विद्यालयात क्रीडा शिक्षक म्हणून सेवा बजावली होती. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संघभावना आणि खिलाडूवृत्ती निर्माण करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. शाळेतील विविध क्रीडा स्पर्धा, परेड, स्काऊट-गाईड उपक्रम तसेच शालेय बँड यामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असायचा.



विशेष म्हणजे खो-खो सारख्या भारतीय खेळाला त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये नव्याने लोकप्रियता मिळवून दिली. अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्यासाठी प्रेरणा दिली होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत आहेत.

विद्यार्थ्यांशी मैत्रीपूर्ण नाते ठेवणारे अटाळे सर हे केवळ शिक्षक नव्हते, तर विद्यार्थ्यांसाठी आधारवड होते. शाळा सोडल्यानंतरही ते माजी विद्यार्थ्यांशी प्रेमाने संवाद साधत असत. त्यांच्या साधेपणामुळे आणि जिव्हाळ्याच्या स्वभावामुळे ते सर्वांच्या मनात कायमचे घर करून गेले.


बालमोहन परिवारातर्फे अटाळे सरांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली असून, “त्यांची शिकवण आणि आठवणी सदैव प्रेरणादायी राहतील,” अशा भावना अनेकांनी व्यक्त केल्या आहेत.

# नितीन गडकरी यांना प्रथम 'भाऊसाहेब चंद्रायण स्मृती पुरस्कार'

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** नेतृत्व आणि राष्ट्र उभारणीतील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी यांना प्रथम कै. भाऊसाहेब चंद्रायण स्मृती पुरस्कार २०२५' देऊन गौरविण्यात येणार आहे. सेंटर फॉर डेव्हलपमेंट रिसर्च (CDR), नागपूर यांच्यावतीने आयोजित हा सोहळा १० मे २०२६ रोजी चिटनवीस सेंटर येथील बनयान हॉलमध्ये संपन्न होईल.

संशोधन, वकिली आणि विकास या माध्यमांतून सार्वजनिक जीवनाला नवी दिशा देणाऱ्या व्यक्तिमत्वांचा सन्मान करण्यासाठी हा पुरस्कार सुरू करण्यात आला आहे. भारताच्या



पायाभूत सुविधांमध्ये क्रांती घडवून आणण्यातील गौरवशाली भूमिका आणि लोककल्याणाप्रती असलेल्या त्यांच्या समर्पणासाठी श्री. गडकरी यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

**सेवेचा वारसा**

हा पुरस्कार भारतीय मजदूर संघाचे ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे समर्पित स्वयंसेवक कै. श्री भाऊसाहेब चंद्रायण यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित करण्यात आला आहे. कामगार चळवळीतील त्यांचा संघर्षमय प्रवास आणि सेवाभावी जीवन आजही पिढ्यानपिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे.

या ऐतिहासिक प्रसंगाचे औचित्य साधून—जे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाच्या प्रारंभाशी देखील जुळून येत आहे—भाऊसाहेबांचे नातू डॉ. कपिल डी. चंद्रायण यांनी लिहिलेल्या त्यांच्या चरित्र आणि आठवणींच्या संग्रहाचे (स्मरणिका) विमोचन देखील या कार्यक्रमात करण्यात येणार आहे.

**सोहळ्याचे तपशील**

भारताचे माजी सर्वोच्च न्यायालय न्यायमूर्ती श्री. विकास सिरपूरकर यांच्या हस्ते हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान केला जाईल. हा सोहळा विविध क्षेत्रातील विचारवंत आणि सामाजिक नेत्यांची उपस्थिती असलेला एक वैचारिक संगम ठरेल, जो 'सीडीआर'च्या सामाजिक परिवर्तनाच्या उद्दिष्टाला अधोरेखित करेल.

दिनांक:१० मे २०२६

वेळ:दुपारी १२:३० वाजता

स्थळ: बनयान हॉल, चितनवीस सेंटर, नागपूर

प्रवेश:केवळ निमंत्रितांसाठी

सार्वजनिक सेवेतील या गौरव सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी 'सेंटर फॉर डेव्हलपमेंट रिसर्च'ने सर्व निमंत्रितांचे स्वागत केले आहे.

# प्रामाणिकपणाचा आदर्श; वाल्मिकी समाजातील अन्नु पारचे यांचा गौरव

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** प्रभाग क्र. १८ मधील वाल्मिकी नगर येथे राहणाऱ्या व वाल्मिकी समाजातील श्रीमती अन्नु अशोक पारचे यांनी प्रामाणिकपणाचा आदर्श घालून दिला आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर हाऊसकीपिंगचे काम करत असताना त्यांना रोख रक्कम व सुमारे २ लाख रुपयांचा चेक सापडला. कोणताही मोह न बाळगता त्यांनी तो चेक तात्काळ आपल्या वरिष्ठांकडे सुपूर्द केला.

त्यांच्या या प्रामाणिक, कर्तव्यनिष्ठ व मूल्याधिष्ठित वर्तनाची दखल घेत संबंधित संस्थेकडून त्यांना सुपरवायझर पदावर पदोन्नती देण्यात आली. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल पनवेल महापालिकेचे महापौर सन्माननीय श्री. नितीन पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. सोबत नगरसेवक श्री. दशरथ म्हात्रे हेही



होते.अन्नु पारचे यांच्या या कृतीमुळे वाल्मिकी समाजाची प्रामाणिकपणा, कष्टाळूपणा आणि सामाजिक बांधिलकी जपणारी परंपरा अधोरेखित झाली आहे. त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# नवी मुंबई मध्ये ग्लोबल बिझनेस समिट चे आयोजन; यू बिझनेस मिट यांचा अनोखा उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** नवी मुंबई मधील प्रथमच ग्लोबल बिझनेस समिट चे आयोजन करण्यात आले आहे. भारत आणि थायलंड यांच्यामधील व्यापार वृद्धीच्या अनुषंगाने हे समिट अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. बेलापूर येथील पार्क या तारांकित हॉटेल मध्ये १८ मे रोजी ही समिट संपन्न होणार आहे.

थायलंडचे माजी उपपंतप्रधान एच इ कॉर्न दब्बरान्सी, इंजीनियरिंग इन्स्टिट्यूट ऑफ थायलंडचे संचालक तथा PEITA चे सल्लागार प्रो. डॉ. चियांचुंग ओदि कलायांनामित्र, भारतातील थाई दुधावासाचे माजी सदस्य तथा PEITA चे सल्लागार थाराडोल थाँगग्रंग, पंतप्रधान कार्यालयातील फॉरेन अफेयर्स सचिव प्रसर्त पियासाचादेश यांचे शिष्टमंडळ या बिझनेस सबमिटमध्ये थायलंड देशाच्या वतीने उपस्थित राहणार आहे. तूर्तास युद्धजन्य परिस्थितीमुळे आखाती देशांतील व्यापार वृद्धी हा विषय संपुष्टात आलेला आहे. होर्मुज समुद्रधुनी रोखून ठेवल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर



त्याचे अत्यंत विपरीत परिणाम दिसून येत आहेत. युनायटेड नेशन्स सोबत महत्त्वपूर्ण बिजनेस ट्रेड डील झालेली असली तरी देखील ती अमलात आणण्यासाठी किती वेळ लागेल याचे कुणाकडे शाश्वत उत्तर नाही. व्यवसायाच्या दृष्टीने महासत्ता असणाऱ्या अमेरिकेला सध्या युद्धाची झळ सोसावी लागत असल्या कारणामुळे भारतीय गुंतवणूकदार व्यवसाय वृद्धी करता या देशाकडे देखील सकारात्मक दृष्टीने पाहत नाहीत. चीन सारखा व्यवसाय वातावरण पोषक देश आपल्या शेजारी असून देखील या देशासोबत असणारी विश्वासार्हता ही नेहमीच वादातीत राहिलेली आहे. याच कारणांमुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये व्यवसाय वृद्धी करण्याकरता भारतातील लघु मध्यम आणि मोठे व्यावसायिक योग्य संधीच्या शोधात आहेत. दुसरीकडे थायलंड सारखा देश हा सातत्याने ऐयाशी करण्याकरता प्रसिद्ध राहिलेला आहे. परंतु या देशातील असणाऱ्या व्यवसाय पोषक परिस्थितीचा भारतातील गुंतवणूकदार आणि व्यावसायिक यांना फायदा होऊ शकतो. याच गोष्टीची चाचपणी करण्याकरता दोन्ही देशांतील व्यावसायिक आणि प्रशासन यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करण्याकरता यु बिझनेस मीट यांच्यावतीने ग्लोबल समिट २०२६ चे आयोजन करण्यात आलेले आहे. १८ मे रोजी संपूर्ण दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले असून या ठिकाणी व्यवसायाचे प्रचार आणि प्रसार करण्यासाठी स्टॉलचे आयोजन देखील करण्यात आले आहे. या समितीमध्ये सहभागी होण्याकरता सशुल्क नावे नोंदणी प्रक्रिया सुरू झालेली असून बुक माय शो च्या माध्यमातून देखील या समितीमध्ये रजिस्ट्रेशन करता येऊ शकेल. रियल इस्टेट, इम्पोर्ट एक्सपोर्ट, बँकिंग, एज्युकेशन, टेक्नॉलॉजी, मेडिकल टुरिझम, लाईफस्टाईल आणि हेल्थकेअर, स्पेशल टुरिझम, स्पिरिचुअल टुरिझम ग्लोबल मीडिया अँड एंटरटेनमेंट या व्यवसाय क्षेत्रांवर प्राधान्य क्रमाने फोकस ठेवण्यात आलेला आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर द्विदेशीय व्यवसाय संधी शोधण्याच्या प्रयत्नात यु बिझनेस मीट यांनी थायलंड या देशापासून सुरुवात केलेली असून नजीकच्या भविष्यात अशाच पद्धतीच्या व्यवसाय सुलभ पोषक वातावरण असणाऱ्या देशांसोबत बिझनेस समिट आयोजित करण्याचे मानस आहे.

# महाराष्ट्र सुवर्ण रत्न पुरस्काराने' पत्रकार गजानन बानोरे सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनीधी. रणजितसिह. ठाकूर :** महाराष्ट्र सुवर्णकार संस्थेचा 'रजत महोत्सव' व सुवर्णालंकाराच्या तीन दशकापूर्ती सोहळयानिमित्त सर्व शाकीय राज्यस्तरीय सोनार महोत्सव राज्यस्तरीय महिला मेळावा २०२६ चे आयोजन ३ मे रोजी नागपूर येथील रेशीम बाग मधील कविवर्य सुरेश भट सभागृहात करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष महाराष्ट्र सुवर्णकार संस्था नागपूर चे पुरुषोत्तमजी कावळे हे होते तर स्वागताध्यक्ष राजेशजी रोकडे, विशेष अतिथी गृहराज्यमंत्री मा. पंकजाची भोयर, महापौर नीताताई ठाकरे, खासदार राजेशजी वर्मा, सुवर्णलंकार मासिकचे मुख्य संपादक प्रकाश माथने, राष्ट्रीय अध्यक्ष जितेंद्र वर्मा, आमदार कृष्णा भाऊ खोपडे, आमदार मोहनजी मते, आमदार प्रवीणजी दटके, माजी आमदार सुधाकर कोहळे, मध्यप्रदेश सराफा असोशिएशनचे अध्यक्ष राजा सराफ, भारतीय सुवर्णलंकार संघ दुलीचंदजी कडेल यांच्यासह अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होते.

या मेळाव्यामध्ये सर्व मान्यवरांनी सोनार समाजातील सर्व शाखांनी एकत्र येऊन सोनार समाजाला विकासात्मक प्रवाहात आणण्याची



आवाहन केले तसेच शाखा भेद न पळता मुला-मुलींचे विवाह पार पाडणे, सोनार व्यवसायातील अडचणी कशा प्रकारे सोडविता येतील यासह अनेक विषयावर व्यासपिठावरील मान्यवरांनी आपले मनोगत या प्रसंगी व्यक्त केले. सोनार समाजातील प्रतिभान व्यक्तीचा तसेच नवनिर्वात सोनार समाजातील नगरसेवक, नगरसेविका, सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तीचा मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व शिल्ड देऊन सन्मान करण्यात आला.

पत्रकारीता क्षेत्रात गेल्या ३५ वर्षापासून कार्यरत असलेले व सामाजिक कार्यात नेहमी सहभागी होणारे पत्रकार गजानन बानोरे यांचा व्यसपिठावरील मान्यवरांच्या हस्ते 'महाराष्ट्र सुवर्ण रत्न पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

# स्वगणना हीच जबाबदारी ; प्रत्येकाने पुढाकार घ्यावा – जिल्हाधिकारी विकास मीना

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव : (यवतमाळ ) :** आगामी जनगणना प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर महागाव तालुक्यातील कलगाव येथील माउंट लिट्रा झी स्कूल येथे सुरू असलेल्या जनगणना प्रशिक्षण केंद्राला जिल्हाधिकारी विकास मीना यांनी भेट देत प्रशिक्षणार्थी शिक्षकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी जनगणना ही केवळ शासकीय प्रक्रिया नसून देशाच्या नियोजनाचा कणा असल्याचे सांगत प्रत्येकाने स्वगणना करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

जिल्हाधिकारी मीना यांनी उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन करताना जनगणनेतील अचूक माहितीचे महत्त्व अधोरेखित केले. "जनगणना ही देशाच्या विकासाची दिशा ठरवणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपली माहिती अचूकपणे नोंदवणे गरजेचे आहे. स्वगणना ही संकल्पना यशस्वी करण्यासाठी शिक्षकांनी जनजागृतीत महत्त्वाची भूमिका बजवावी," असे त्यांनी नमूद केले.

प्रशिक्षण केंद्रातील व्यवस्थेची पाहणी करत त्यांनी प्रशिक्षणार्थींशी थेट संवाद साधला आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. जनगणना प्रक्रियेत येणाऱ्या तांत्रिक बाबी, माहिती संकलनातील बारकावे तसेच नागरिकांशी संवाद साधताना घ्यावयाची काळजी याबाबतही त्यांनी



मार्गदर्शन केले. यामुळे उपस्थित शिक्षकांना प्रत्यक्ष काम करताना अधिक आत्मविश्वास मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या भेटीदरम्यान उपविभागीय अधिकारी राम मुळे, तहसीलदार अभय मस्के तसेच नायब तहसीलदार (निवडणूक) वैभव पवार मंडळ अधिकारी प्रकाश माने,मारोती एकूलवार यांनीही प्रशिक्षणार्थींना आवश्यक सूचना दिल्या. त्यांनी जनगणना कार्य वेळेत आणि अचूक पार पाडण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले.


कार्यक्रमाच्या शेवटी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशिक्षण केंद्राच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त करत आगामी जनगणना यशस्वी करण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने काम करावे, असे सांगितले.

# JSW स्टीलच्या कांदळवन अतिक्रमणावर वन विभागाचा उशिरा 'आक्रमक' पवित्रा

## भूमाफिया– अधिकाऱ्यांच्या 'गुप्त बांधिलकी'ची चर्चा तापली!

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील शहाबाज ग्रामपंचायत हद्दीत सरकारी राखीव वन जमिनीवर JSW स्टील कंपनीने कांदळवनांची कत्तल करून अनधिकृत अतिक्रमण केले असताना, कांदळवन विभागाने आता उशिराने आक्रमक पवित्रा घेतला आहे. सामाजिक कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत यांच्या सतत पाठपुराव्याने हालचाली सुरू झाल्या असल्या तरी प्रशासनाची 'निष्क्रियता' आणि चौल-रेवदंडा परिसरातील भूमाफिया-अधिकाऱ्यांच्या 'पडद्याआड गुप्त बांधिलकी'ची चर्चा जनतेत तापली आहे. एकूण १.८४ हेक्टर जमिनीपैकी ०.५० हेक्टर कांदळवन विभागाकडे, तर १.३४ हेक्टर महसूल विभागाकडे असून, दोन्ही ठिकाणी जे.एस.डब्ल्यू.ने कांदळवन नष्ट करून भराव टाकले आहेत. प्रशासन कधी कारवाई करणार, असा सवाल उपस्थित होत आहे.धक्कादायक तपास अहवाल:



कांदळवनांची 'खुलेआम' कत्तल!अलिबाग तालुक्यातील मौजे जुई बापुजी, सर्वे नंबर ५०-ड मधील १.८४ हेक्टर सरकारी राखीव वन जमिनीवर JSW स्टीलने २००९ पासून विनापरवाना वनेत्तर कामे सुरू केली. उप वनसंरक्षक, अलिबाग यांच्या १३ डिसेंबर २०१९ च्या अहवालानुसार, कंपनीने प्रकल्प विस्तारासाठी कांदळवन नष्ट करून भराव टाकला. जानेवारी २०२० च्या महसूल-भूमी अभिलेख संयुक्त मोजणीत खालील बाबी उघड झाल्या:संपूर्ण १.८४ हेक्टरवर अतिक्रमण; कांदळवनाचा पूर्ण सफाया. खाडी काठावर अनधिकृत संरक्षण भिंत: पश्चिमेकडून ८७ मी., मध्यभागी ३६ मी., दक्षिणेकडून १०२ मी. लांबीची.नैसर्गिक खाडीचे पाणी बंद करून रात्रीच्या काळोखात भराव टाकले.या गंभीर परंपरेची दखल घेत वन विभागाने ३ फेब्रुवारी २०२० रोजी भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलम २६(१) ए, डी, एफ, एच अंतर्गत गुन्हा दाखल केला (क्र. ई/०२/२०१९-२०२०). मात्र, साडे सहा वर्षांनंतरही तपास 'सुरू' असल्याचा बहाणा!

चौल-रेवदंडा भूमाफिया-अधिकाऱ्यांच्या 'बंद पाकिट' खेळाची अफवा?

चौल दादर येथील उघडीमधून येणारे नैसर्गिक खाडीपाणी बंद करून रात्री अनधिकृत भराव टाकत कांदळवनांची कत्तल चालू आहे. जनतेत खुलेआम चर्चा आहे की, वनखात्याचे कांदळवन कक्ष आणि स्थानिक भूमाफिया यांच्यात 'बंद दरवाजे'आड 'गुप्त व्यवहार' होत आहेत. "चौलमध्ये कारवाई का होत नाही? केंद्र-राज्य सरकार का डोळे झाकून बसले?" असा रोष व्यक्त होत आहे. सावंत यांनी मुंबई उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाच्या (न्या. गवई, मसीह, चंद्रन खंडपीठ) निकालांचा संदर्भ देत कठोर कारवाईची मागणी केली आहे.

**उशिरा हालचाल पण कारवाई होणार का?**

कांदळवन विभागाच्या सहाय्यक वनसंरक्षक प्रियंका पाटील यांनी तहसीलदार, अलिबाग यांना पत्र लिहून महसूल विभागातील १.३४ हेक्टर अतिक्रमणाबाबत सविस्तर अहवाल मागवला असून, त्याची प्रत सावंत यांना देण्यात आली. मात्र, प्रशासनाची ही 'हालचाल' खरी धारदार कारवाईपर्यंत पोहोचेल का? जे.एस. डब्ल्यू.सारख्या मोठ्या कंपन्यांविरुद्ध भूमाफिया-अधिकाऱ्यांच्या 'साटेलोट्यांचा' खेळ उघड होईपर्यंत पर्यावरणाचे नुकसान चालूच राहील का? जनतेच्या डोळ्यातील प्रश्न कायम आहेत.

# भिलखेडा येथे २५ एकरात साकारणार उपवन संशोधन केंद्र : शिलान्यास दिमाखात संपन्न



**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर :** पर्यावरणाचा समतोल ढासळत असताना निसर्ग संवर्धनाची गरज प्रकर्षाने जाणवते. याच गरजेतून चिखलदरा तालुक्यातील भिलखेडा येथे २५ एकर क्षेत्रावर 'श्रीमती नर्मदाबाई लाडोळे उपवन संशोधन केंद्र' उभारण्यात येत आहे. या केंद्राचा शिलान्यास सोहळा मंगळवारी मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक विज्ञानाची सांगड घालणारे हे केंद्र विदर्भासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. येथे पुढील उपक्रम राबवले जाणार आहेत:

वृक्ष व जैवविविधता संवर्धन: दुर्मिळ वनस्पतींचे जतन व नव्याने लागवड.

शाश्वत शेतीला प्रोत्साहन: सेंद्रिय शेती, वनौषधी लागवड यांचे प्रशिक्षण.

संशोधन व मार्गदर्शन: शेतकरी आणि विद्यार्थ्यांसाठी संशोधनाच्या सुविधा व तज्ज्ञांचे मार्गदर्शन.

रोजगार निर्मिती: स्थानिक युवकांना प्रशिक्षण देऊन कृषी-आधारित रोजगाराच्या संधी.

या केंद्रामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावेल व विद्यार्थ्यांना संशोधनाची नवी दालने खुली होतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार गजानन लवटे होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रमुख संशोधक प्रा. डॉ. डी. एन. मोकाट व आयुष मंत्रालयाच्या नॅशनल मेडिसिनल प्लांट बोर्डाचे सदस्य जगन्नाथ धर्मे प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

कार्ड संस्थेचे विजयकुमार लाडोळे, अभियंता श्रीकृष्णजी टोगसे, तालुका कृषी अधिकारी अतुल भासाकडे, उप कृषी अधिकारी संजयजी येवले, किशोरजी चौधरी, सेवानिवृत्त वनाधिकारी रा. भ. गिरी, रविन्द्रजी पाटील, वृक्ष संवर्धन फाउंडेशनचे अध्यक्ष इंजि. हरिहर बोचरे, संचालक सौ. सुनंदा कतारे, मिलिंद लाडोळे, पंकज चौकीकर यांच्यासह परिसरातील शेतकरी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पर्यावरण रक्षणाच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असून हे केंद्र भविष्यात मैलाचा दगड ठरेल, अशी ग्वाही मान्यवरांनी यावेळी दिली.

# महिलेचे फोटो व्हायरल करण्याची धमकी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** महिलेच्या पतीला धक्काबुक्की करून आरोपीने महिलेचे नकळत काढलेले नग्न अवस्थेतील फोटो व्हायरल करण्याची धमकी दिल्या प्रकरणी आरोपी विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.यातील पीडित महिला आणि 28 वर्षीय आरोपी हे एकमेकांचे शेजारी समोरासमोर राहण्यास आहेत. त्यांच्यात दोन वर्षांपासून प्रेम संबंध आहेत. सदरचे प्रेम प्रकरण फिर्यादी यांच्या पतीला 2 महिन्यांपूर्वी माहिती झाले. त्यानंतर फिर्यादी यांनी आरोपी सोबत बोलणे आणि भेटणे बंद केले. त्यानंतर आरोपी याने फिर्यादी यांच्याकडे त्यांच्या घरासमोर येऊन सतत पाहणे तसेच भेटण्यासाठी बोलवणे सुरू केले. मात्र पीडित फिर्यादी या आरोपी यांना भेटत नसल्याने त्याने त्यांच्या पतीला धक्काबुक्की केली आणि आरोपी याच्या मोबाईल फोनमधील पीडित महिलेचे नकळत काढलेले नग्न अवस्थेतील फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली.

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना जाहीर सूचित करण्यात येते की,

कु. तनू राजेंद्र तोरगल सौ. तनू भरत नाडगीर ही दोन्ही नावे एकाच व्यक्तीची आहेत.

लग्नापूर्वी संबंधित व्यक्तीचे नाव वडिलांच्या नावासह कु. तनू राजेंद्र तोरगल असे होते. त्यानंतर विवाह झाल्यानंतर पतीच्या नावासह संबंधित व्यक्तीचे नाव सौ तनू भरत नाडगीर असे झाले आहे.

त्यामुळे वरील दोन्ही नावांचा उल्लेख ज्या कोणत्याही कागदपत्रांमध्ये, दाखल्यांमध्ये किंवा शासकीय/खाजगी नोंदींमध्ये आढळून येईल, त्या दोन्ही नावांची व्यक्ती एकच समजण्यात यावी.

याबाबत कोणास काही हरकत असल्यास त्यांनी योग्य पुराव्यासह संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा.

**दिनांक : 8/5/2026**
**ठिकाण : पनवेल**

**सही**
**(कु. तनू राजेंद्र तोरगल)**

## जाहीर नोटीस

नमुना एन डी
(नियम ९२(३) पहा)

लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की,परवाना क्र. MH2023-CC-4914A मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH46BP3934 चे मालक कै.विश्वानाथ राम वास्कर याचं दिनांक 18/09/2024 रोजी निधन झाले आहे.

मी
नूतन विश्वानाथ वास्कर
रूम नं -52,ब कुंदेवाहल, पो-पारगाव,ता-पनवेल, रायगड, महाराष्ट्र, -410206.

उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.

याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.

**उत्तरआधिकारचे नाव**
**नूतन विश्वानाथ वास्कर**
**रूम नं -52 ब, कुंदेवाहल, पो -पारगाव.ता-पनवेल, रायगड,महाराष्ट्र,410206.**

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# लाखनी तालुक्यात गॅस सिलेंडरचा काळाबाजार बोकाळला ; प्रशासन बेफिकीर

**दैनिक युवक आधार**
**रोशन खोब्रागडे**

**लाखनी** - लाखनी तालुक्यात गॅस सिलेंडरच्या काळाबाजाराने अक्षरशः थैमान घातल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. सर्वसामान्य नागरिक, विशेषतः शेतकरी व मजूर वर्ग यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून, तालुका प्रशासन मात्र या सर्व प्रकाराकडे डोळेझाक करत असल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.स्थानिक नागरिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गॅस सिलेंडरचे बुकिंग करूनही वेळेत पुरवठा होत नाही. उलटपक्षी, जास्त दर देणाऱ्यांना प्राधान्य दिले जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मध्यरात्री गॅस सिलेंडरच्या गाड्या खाली करण्यात येत असून काळाबाजाराला खतपाणी मिळत आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ता संतोष ऊकनकर यांनी प्रशासनावर जोरदार हल्लाबोल चढवला आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले की, “तालुका प्रशासनाची ही बेफिकिरी सर्वसामान्यांच्या सहनशक्तीचा अंत पाहत आहे.”

ऊकनकर यांनी पुढील ठोस मागण्या केल्या आहेत. १) पोलीस प्रशासनाला सोबत घेऊन विशेष नियोजन समितीची तात्काळ स्थापना करावी २) गॅस बुकिंग केलेल्या ग्राहकांची यादी सार्वजनिक करावी

३) सिलेंडर वाटपात पूर्ण पारदर्शकता ठेवावी. ४) शेतकरी व मजूर वर्गाला होणारा त्रास तात्काळ थांबवावा. दरम्यान, हा प्रकार Essential Commodities Act अंतर्गत गंभीर गुन्हा ठरत असल्याने प्रशासनाने तातडीने कारवाई करणे आवश्यक आहे.

शेवटी, “जर प्रशासनाने अद्यापही हलगर्जीपणा कायम ठेवला, तर लाखनी तालुक्यात तीव्र जनआंदोलन उभे राहील,” असा थेट इशारा संतोष ऊकनकर यांनी दिला आहे.

# मालेगाव तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या वतीने थॅलेसेमिया मुक्त अभियानात सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी. रणजितसिह. ठाकूर** : दिनांक 05 मे मालेगाव तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या वतीने "एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे"या अभियानाची सुरुवात डॉ.पांडुरंग ठोंबरे सर जिल्हा आरोग्य अधिकारी,श्री. पुरुषोत्तम इंगोले जिल्हा सिकलसेल कार्यक्रम समन्वयक NHM वाशिम यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार करण्यात आली आहे .दिनांक 01 ते 08 मे दरम्यान साजरा होणाऱ्या थॅलेसेमिया सप्ताह निमित्त विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत या उपक्रमाला तालुका आरोग्य अधिकारी डॉ. खासबागे मॅडम, वैद्यकीय अधीक्षक यांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला हा आजार रक्ताशी संबंधित आहे.हा अनुवंशिक आजार असून तो




पालकाकडून मुलांमध्ये जातो भारतात याबालके जन्माला येऊ नयेत यासाठी तरुणांनी विवाहपूर्वक थॅलेसेमियाची तपासणी करून घेने अत्यावश्यक आहे. वाहक व्यक्तींनी परस्पर विवाह टाळल्यास या आजारावर नियंत्रण मिळवणे शक्य असल्याचे प्रतिपादन मालेगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ. खासबागे मॅडम यांनी केले. या अभियानांतर्गत 01 ते 40 वर्ष वयोगटातील सर्व नागरिकांनी आपली थॅलेसेमिया आजाराची तपासणी करून घ्यावी असे आवाहन डॉ.खासबागे मॅडम यांनी केले आहे.

जिल्हा थॅलेसेमिया मुक्त करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा आणि आपल्या जवळच्या सरकारी शासकीय दवाखान्यात जाऊन तपासणी करून घ्यावी असे सांगण्यात आले. या अभियानांतर्गत उपक्रम शाळा महाविद्यालय ग्रामपंचायत व ग्रामीण पातळीवर जनजागृती रक्त तपासणी शिबिरे (CBC,HB Electrophoresis) विवाहपूर्व समुपदेशन (Genetic counseling) गर्भवती महिलांसाठी विशेष तपासणी सुविधा आरोग्य कर्मचारी व आशा कार्यकर्त्यामार्फत जनजागृती व आजारा विषयी पूर्ण माहिती व मार्गदर्शन तालुका सिकलसेल सहाय्यक श्री भारत पारवे यांनी केले.

*काय आहे थॅलेसेमियाचे प्रकार* .१) थॅलेसेमिया मायनर ( वाहक अवस्था) व्यक्तीला लक्षणे कमी असतात .परंतू तो आजार पुढे देऊ शकतो.थॅलेसेमिया इंटरमिडिया मध्यम स्वरूपाचा आजार आहे.

२) थॅलेसेमिया मेजर:- गंभीर प्रकार , नियमित रक्त चढवणे आवश्यक.

कशी करावी तपासणी.:- CBC ( Complete Blood count) प्राथमि तपासणी.

HB Electrophoresis/ HPLC टेस्ट थॅलेसेमिया निश्चित ओळखण्यासाठी महत्वाची. कौटुंबिक (Genetic)सल्ला- विवाहपूर्व मार्गदर्शनसाठी आवश्यक गर्भधारणे दरम्यान तपासणी गर्भातील बाळाची स्थिती तपासण्यासाठी.

# नाथपंथाच्या परंपरेचा जागर; निफाडमध्ये राज्यस्तरीय संमेलन

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, त्र्यंबकेश्वर आणि श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, निफाड यांच्या संयुक्त विद्यमाने येथील वैनतेय विद्यालय परिसरात दि. १० व ११ मे २०२६ रोजी दोन दिवसीय भव्य नाथ संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून, संमेलनासाठी जय्यत तयारी पूर्ण झाल्याची माहिती स्वागताध्यक्ष वि. दा. व्यवहारे आणि समन्वयक मिलिंद चवंडके यांनी पत्रकार परिषदेत दिली.

संमेलनाच्या पहिल्या दिवशी, दि. १० मे रोजी पहाटे ६ वाजता श्रींचा अभिषेक तसेच नाथपंथीय होम-हवनाने कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. त्यानंतर सकाळी ८ वाजता मंगल वाद्यांच्या गजरात भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेत मंगळ कलश घेतलेल्या युवती व



सुवासिनींसह राज्यभरातून आलेले भाविक सहभागी होणार आहेत. नवनाथांच्या जागृत स्थानांवरील पवित्र मृत्तिका आणि देवीच्या शक्तिपीठांवरील कुंकवाचे कलश हे शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

सकाळी १०.३० वाजता शोभायात्रा संमेलनस्थळी पोहोचल्यानंतर चित्रमय प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात येईल. त्यानंतर सकाळी ११ वाजता संमेलनाचे उद्घाटन संकेश्वर (कर्नाटक) येथील श्री संस्थान मठाचे जगद्गुरू शंकराचार्य सच्चिदानंद अभिनव विद्या नरसिंह भारती यांच्या हस्ते होणार आहे. या उद्घाटन सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून त्र्यंबकेश्वर येथील अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठचे चंद्रकांत मोरे तसेच खासदार भगरेसर उपस्थित राहणार आहेत.

दुपारी १ ते २ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर दुपारी २ ते ३ या वेळेत गोरखपूर येथील महायोगी गुरु श्री गोरक्षनाथ शोधपीठाचे उपनिदेशक डॉ. श्री कुशलनाथ मिश्रा यांचे ‘नाथपंथ आणि मच्छिंद्रनाथ’ या विषयावर विशेष व्याख्यान होणार आहे.

नाथ संप्रदायाची परंपरा, अध्यात्म आणि सांस्कृतिक वारसा यांचा परिचय करून देणारे हे संमेलन भाविकांसाठी पर्वणी ठरणार असून, मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# चि . सौ .का .सुश्मिता केणी हिला आशीर्वाद देण्यासाठी नामदार भरतशेठ गोगावले यांची चिंचपाड्यात उपस्थिती ; केणी परिवारासोबत जपला घरगुती स्नेह !

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी** : राज्याचे रोजगार हमी व फलोत्पादन आणि खारभूमी विकास मंत्री नामदार भरतशेठ गोगावले साहेब यांनी आपल्या व्यस्त दौऱ्यातून वेळ काढत पनवेलमधील वडघर रोड, चिंचपाडा येथील केणी परिवाराच्या विवाहकार्याला सदिच्छा भेट दिली. निमित्त होते चि. सौ. कां. सुश्मिता सदाशिव केणी यांच्या हळदी समारंभाचे!

पुनर्वसन वडघर रोड, सेक्टर आर २चिंचपाडा येथील रायगड जिल्हा परिषद शाळे शेजारी असलेल्या 'राधाई सुकीर निवास' या निवासस्थानी हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. नववधू सुश्मिता ही सचिन केणी यांची पुतणी असून, केणी परिवार आणि नामदार भरतशेठ गोगावले यांचे गेल्या अनेक वर्षांपासूनचे कौटुंबिक जिव्हाळ्याचे संबंध आहेत. याच स्नेहापोटी साहेबांनी आवर्जून उपस्थित राहून सुश्मिता हिला लग्नाचे आशीर्वाद आणि शुभेच्छा दिल्या.



मंत्री महोदयांचे आगमन होताच सदाशिव केणी आणि समस्त केणी परिवाराच्या वतीने त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. सचिन केणी आणि नामदार गोगावले साहेब यांच्यातील जुन्या आणि जिव्हाळ्याच्या मैत्रीमुळे या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले. राजकारणापलीकडे जाऊन कार्यकर्त्यांच्या कुटुंबातील आनंदात सहभागी होण्याच्या साहेबांच्या स्वभावाचे सचिन केणी व परिसरात मोठे कौतुक होत आहे.चि. सौ. कां. सुश्मिता आणि चि. जयेश यांचा हा जंगी शुभविवाह सोहळा आज गुरुवार दिनांक ७ मे रोजी सायंकाळी ६ वाजताच्या शुभमुहूर्तावर संपन्न झाला आहे .नामदार भरत शेठ गोगावले यांच्या उपस्थितीने विवाह सोहळ्याचा आनंद आधीच द्विगुणीत झाला असून संपूर्ण चिंचपाडा परिसरात या राजेशाही भेटीची चर्चा रंगली आहे.

# स्वर्गीय जनार्दन भगत यांना शेलघर येथील निवास्थानी पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी** : थोर समाजसुधारक स्वर्गीय जनार्दन भगत साहेबांनी आपले संपूर्ण आयुष्य 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या तत्त्वासाठी वेचले. त्यांच्या अथांग कार्यामुळेच आपल्या परिसराला नावलौकिक प्राप्त झाला आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी शेलघर येथे केले. स्वर्गीय जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या शेलघर येथील निवासस्थानी आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.

थोर समाजसुधारक स्वर्गीय जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त गुरुवारी स्वर्गीय जनार्दन भगत यांच्या शेलघर येथील निवासस्थानी भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, शकुंतला ठाकूर, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी भगत साहेबांच्या पवीत्र स्मृतीस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

जनार्दन भगत यांनी शिक्षण आणि न्यायदानाचे महत्त्वपूर्ण कार्य करून सर्वसामान्य माणसाला आधार दिला. गावांमधील तंटे सोडवताना कोणावरही अन्याय होणार नाही याची त्यांनी नेहमीच सामाजिक भूमिकेतून काळजी घेतली, अशा शब्दांत मान्यवरांनी त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला. या अभिवादन सोहळ्यासाठी भाजप जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, संजय भगत, पंचायत समिती सदस्या जिज्ञासा कोळी, माजी सदस्य भाऊशेठ पाटील, रत्नप्रभा घरत, वर्षा ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, तेजस कांडपिळे, वसंतशेठ पाटील, अरुणशेठ ठाकूर, जयवंत देशमुख, जितेंद्र म्हात्रे, विश्वनाथ कोळी, माजी उपसरपंच सचिन घरत, अशोक कडू यांच्यासह स्वप्निल ठाकूर, कृपेश कांडपिळे, प्रकाश भगत, अजय भगत आणि इतर अनेक पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# “व्हॉईस ऑफ मीडिया” तर्फे जिल्हाधिकारी सावन कुमार यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी स्वप्नील काटवले साकोली भंडारा** : आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या “व्हॉईस ऑफ मीडिया” भंडारा जिल्हा शाखेतर्फे बुधवारी (६ मे) जिल्हाधिकारी सावन कुमार यांचा मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.


नुकत्याच पार पडलेल्या व्हॉईस ऑफ मीडिया जिल्हा कार्यकारिणी पदग्रहण सोहळा व पत्रकार कार्यशाळेला जिल्हाधिकारी अनुपस्थित राहिल्याने, जिल्हा पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकारांच्या विविध समस्यांवर चर्चा केली.यावेळी पत्रकारांसाठी भंडारा मुख्य विश्रामगृह परिसरातील “बावनथडी” किंवा “वाघ” या दोन सूटपैकी एक सूट नियमित बैठक कक्षासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.




कार्यक्रमाला जिल्हाध्यक्ष शशिकांत भोयर यांच्या मार्गदर्शनात शहराध्यक्ष काशिनाथ ढोमने, उपाध्यक्ष विशाल रणदिवे, साकोली तालुका अध्यक्ष आशिष चेडगे, महासचिव कालिदास खोब्रागडे, सचिव डी. जी. रंगारी तसेच तुषार पशीने, किशोर गडकरी, राकेश शामकुंवर, संजय नागदेवे, विलास केझरकर, समीर नवाज, मुकेश मेश्राम आदी उपस्थित होते.

# सिल्लोड बसस्थानकावर वृद्धेची सोन्याची ‘एकदानी’ चोरीला

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर**
**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख** : सिल्लोड :-शहरातील मुख्य बसस्थानकावर मंगळवारी (दि. ५) सायंकाळी प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी एका ७० वर्षीय वृद्ध महिलेच्या गळ्यातील सुमारे दीड लाख रुपये किमतीची सोन्याची 'एकदानी' चोरून नेली. ही घटना सायंकाळी ४:४५ वाजेच्या सुमारास सिल्लोड-वांगी बसमध्ये चढत असताना घडली. याप्रकरणी सिल्लोड शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, कमलबाई तेजराव हावळे (वय ७०, रा. मोढा बुद्रुक, ता. सिल्लोड) या छत्रपती संभाजीनगर येथून आपल्या गावी जाण्यासाठी संभाजीनगर-सिल्लोड बसने येथे आल्या होत्या. सिल्लोड येथे त्यांनी बस बदलली. सायंकाळी पावणेपाचच्या सुमारास त्या सिल्लोड-वांगी एसटी बसमध्ये चढत असताना प्रवाशांची मोठी गर्दी होती. याच गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी कमलबाई यांच्या गळ्यातील ३३ मणी असलेली आणि सुमारे एक तोळा वजनाची (किंमत १ लाख ५० हजार रुपये) सोन्याची एकदानी शिताफीने लांबवली.

बसमध्ये बसल्यानंतर गळ्यातील दागिना गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले . कमलबाई हावळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सिल्लोड शहर पोलिसांनी मंगळवारी रात्री अज्ञात चोरट्यांविरुद्ध कायदेशीर गुन्ह्याची नोंद केली आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## १००% टक्के निकाल; विद्यार्थी घडवायचे तर असे !

# यावर्षी सुद्धा आर्ट्स ऑफ लाईफ कोचिंग लाखनीने सिद्ध केले की विद्यार्थी कसलाही असो त्याला घडवता येतो

**दैनिक युवक आधार**
**भावेश धंधुकीया भंडारा जिल्हा प्रतिनिधी** : विद्यार्थ्यांना घडवायची कला फक्त आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंगलाच येते. आर्ट्स ऑफ लाईफ कोचिंग गेले चार वर्षापासून आपल्या कौशल्यतेचा प्रमाण देत आली आहे. कुठलाही विद्यार्थी कितीही मागे असला कितीही कमजोर असला तरी सुद्धा त्याच्यावर प्रामाणिकपणे आणि निरंतर पणे मेहनत करून त्याच्यावर कार्य करून त्या विद्यार्थ्याला योग्य मार्गदर्शन देऊन त्याचे शिक्षणाला सामोर नेण्याचं कार्य हे आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग नेहमीप्रमाणे करत आहे. पहिल्या वर्गापासून ते दहाव्या वर्ग पर्यंत शिकवणी वर्ग असलेली आर्टस ऑफ लाइफ कोचिंग लाखनी प्रत्येक विद्यार्थ्यांवर खूप प्रामाणिकपणे काम करते. प्रत्येक विद्यार्थ्यांचे कमीपणा जाणून घेऊन त्या सर्वांवर ते योग्यरीत्या शैक्षणिक पुढाकार घेते. दरवर्षीप्रमाणे




यावर्षी सुद्धा आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग च्या विद्यार्थ्यांनी दाखवून दिलं की प्रामाणिकपणे आणि योग्य मार्गदर्शनाखाली जर आपण अभ्यास केला तर नक्कीच यश मिळतो. शैक्षणिक दृष्ट्या मागे असलेले आर्थिक दृष्ट्या मागे असलेले विद्यार्थी सुद्धा चांगला यश मिळवू शकतात याचे प्रमाण नेहमी आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग देत आली आहे. आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग चे संचालक श्री निहाल वालदे सर नेहमी असे म्हणतात की विद्यार्थ्यांना घडवायचं असेल तर आर्ट्स ऑफ लाईफ कोचिंग तुमची आहे अन्यथा तुम्ही कुठेही विद्यार्थ्यांना शिकवू शकता. स्वतःच्या कमीपणावर प्रामाणिकपणे कार्य करून प्रत्येक विद्यार्थ्यांनी यावर्षी सुद्धा भरघोस यश मिळवलेला आहे. लाखनी तालुक्यातील बहुतांश गावांमधील विद्यार्थी आर्ट्स ऑफ लाईफ कोचिंग मध्ये शिकायला येतात त्यामधील काही विद्यार्थ्यांनी खूप कौतुकास्पद यश मिळवलेला आहे त्यापैकी लाखनी मधील काही विद्यार्थी म्हणजे कृतिका खराबे, खुशी नागपुरे, किंजल नागदेवे, धैर्यवी कोटांगले, तपस्या नागपुरे, साची खंडाइत, तन्मय डहाके, दरवेश वालोदे, लक्ष धंदुखिया, दिशांत राऊत, यत्नेश बोरकर, निरव खराबे, तन्मय नागपुरे, हितेन बावनकुळे, गुंथाऱ्यावरून शिकायला येत असणारी क्रांतीनी वाहाने, गळेगाव वरून शिकायला येत असणारा दक्ष बावनकर आणि सम्यक टेंभुर्णीकर अशा भरपूर विद्यार्थ्यांनी स्वतःचा कमीपणा दूर करून आपल्या जीवनामध्ये एक नवीन पाऊल टाकलेला आहे आणि यावर्षी २०२५-२६ सत्रामध्ये भरघोश यश मिळवलेला आहे त्या सर्वांना आर्ट्स ऑफ लाईफ कोचिंगच्या संचालकांनी म्हणजेच श्री निहाल सरांनी खूप खूप शुभेच्छा दिलेले आहेत आणि नेहमीच या विद्यार्थ्यांवर मनापासून शैक्षणिक कार्य करण्याचे त्यांनी निश्चय केलेले आहे आणि सर्वांना आश्वासन पण दिलेले आहे.

# कलापथकाच्या सुरांनी घुमला वणवा मुक्तीचा नारा ; घोडदरा येथे रंगला प्रबोधनाचा जागर

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर** : निसर्गाचा अनमोल ठेवा असलेल्या जंगलांना वणव्यापासून वाचवण्यासाठी वनविभाग पांढरकवडा आणि घाटंजी येथील स्वर जीवन सांस्कृतिक कला व बहुउदेशीय संस्थेने पुढाकार घेतला आहे. ६ मे रोजी सायंकाळी घोडदरा येथे पार पडलेल्या एका आगळ्यावेगळ्या कार्यक्रमात कलापथकाच्या माध्यमातून ग्रामस्थांना निसर्ग रक्षणाची साद घालण्यात आली. पांढरकवडा वनविभागाचे उपवनसंरक्षक श्री. यशवंत बहाळे (भा.व.से.) यांच्या थेट मार्गदर्शनाखाली हा प्रबोधनाचा जागर रंगला.उन्हाळ्याच्या काळात लागणारा वणवा केवळ झाडेच नव्हे, तर वन्यजीवांचा संसारही उद्ध्वस्त करतो. हे भीषण वास्तव स्वर जीवन संस्थेच्या कलाकारांनी आपल्या कलेतून अत्यंत प्रभावीपणे मांडले. वनसंपदेचे महत्त्व आणि वणव्याचे दुष्परिणाम सांगताना या कलाकारांनी उपस्थितांची मने जिंकली. यावेळी उपवनसंरक्षक यशवंत बहाळे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी व्ही. एम. दुबे यांनी गावकऱ्यांशी संवाद साधताना वणवा प्रतिबंधासाठी लोकसहभागाचे महत्त्व



अधोरेखित केले.

या सोहळ्याला क्षेत्र सहाय्यक व्ही. एस. चौधरी, वनरक्षक कोटनाके मॅडम, मेश्राम मॅडम, आडे साहेब, सोडगीर साहेब तसेच पोलीस पाटील गोडे पाटील, उपसरपंच गजूभाऊ मेश्राम, गणेशभाऊ किरणकर, खुशाल टेकाम यांच्यासह स्वर जीवन संस्थेचे अध्यक्ष प्रफुल राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. कलापथकातील भूपेंद्र राऊत, नरेश कुंटलवार, राजू कुंटलवार, अजय गजबे, प्रफुल राऊत, राज कोरले, पिंटू मेश्राम, हिना, स्नेहल लोहकरे आणि अमोल जाधव या कलाकारांनी आपल्या सादरीकरणाने गावात पर्यावरण रक्षणाची नवी चैतन्य ज्योत पेटवली. घोडदरा येथील मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या ग्रामस्थांनी या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.

# जयभीम नगर, त्रिशरण चौक, रामेश्वरी रोड, नागपूर येथे बुद्ध जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**

**नागपूर डॉ सुनिल भगत :** जयंती उत्सव समिती, जयभीम नगर , त्रिशरण चौक , रामेश्वरी मार्ग, नागपूर सोसायटी द्वारे , महात्मा फुले ,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, भगवान बुद्ध ह्यांची संयुक्त जयंती निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

बुद्ध वंदना आणि प्रवचन वंदनीय भंते बोधीरत्न ह्यांनी केले.त्यागमूर्ती रमाई भीमराव आंबेडकर ही रमाई च्या जीवना वरील लघु नाटिका रमाई च्या रूपात शोभा गौतम पाटील* यांनी व सोबत बाबासाहेब च्या रुपात गौतम पाटील ह्यांनी, भूमिका सादर केली आणि बौद्ध बांधवाची मनेजिंकली.

"ज्योतिबा का संघर्ष"

ही महात्मा फुले आणि सावित्री देवी फुले यांच्या संघर्षाची कहाणी वर आधारित पथनाटिका रॉकी घुटके, अजय



रहाटे,माधुरी मेश्राम,प्रा. माणिकराव लोणारे,चंदा मोटघरे, गौतम पाटील, डॉ सुनिल भगत, आणि इतर मान्यवर यांनी सादर केली.श्वेता गजभिये यांनी सूत्र संचालन केले.

डॉ सुनिल भगत, देवयानी भगत, गौतम पाटील, अजय रहाटे, सुषमा शेवडे, विजया श्रीखंडे, प्रीती नगरारे, मंगला गाणार, यांनी भीम आणि बुद्ध गीते सादर केलीत. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे, राज्य कार्य कारणी सदस्य ,रामभाऊ डोंगरे यांनी महा. अनिसचे भूमिका स्पष्ट केली.महा अनिस चे ज्येष्ठ पदाधिकारी विजया श्रीखंडे, डॉ सुनिल भगत, देवयानी भगत, शीला डोंगरे, डॉ विकास होले, सुषमा शेवडे, सुमेर शेवडे, इंदू उमरे, प्रीती नगरारे, उत्तम सालवणकर, वंदना मेंढे, मंगला गाणार आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**रामभाऊ डोंगरे यांनी सूत्र सांभाळली आभार प्रदर्शन**

सुधीर गजभिये यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रकाश शं. चवरे (अध्यक्ष), सुभाष तु. सहारे (उपाध्यक्ष), सुभाष ब. कांबळे, ज्योती अ. फडके, सतीश भी. गेडाम, संगीता अ. चौधरी, कविता प्र. महाजन, विणा शै. वानखेडे, छाया मा. गुडधे, अपर्णा आ. वाहाने, शामल मी. मेंढे, राखी अ. गजभिये, कमलेश प्र. रंगारी, अनिकेत रा. खोब्रागडे, अभिजीत भी. गजभिये, स्वप्नील मु. गजभिये, प्रियांका स्व. गजभिये, पारितोष दा. खांडेकर. भदंत बोधिरत्न, डॉ. आशिष बागडे, सुधीर गजभिये ह्यांनी अथक परिश्रम घेतले. जयभीम नगर निवासी प्रेक्षक वर्ग कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# कोट्यवधींच्या वैकुंठगमन सोहळ्याचा हिशोब कुठे? भरवस फाट्यात चर्चा रंगली

## देणग्या, वर्गणी आणि खर्चाचा तपशील जाहीर करण्याची मागणी; भाविकांमध्ये चर्चांना उधाण

**दैनिक युवक आधार निफाड**

**राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी** : निफाड तालुक्यातील भरवस फाटा येथे दोन वर्षांपूर्वी मोठ्या उत्साहात पार पडलेल्या 'जगद्गुरु तुकोबाराय त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी वैकुंठगमन सोहळ्या'च्या आर्थिक हिशोबाबाबत आता विविध स्तरांतून प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. कार्यक्रमासाठी जमा झालेल्या देणग्या, वर्गणी व इतर निधीचा अधिकृत तपशील अद्याप जाहीर न झाल्याने भाविकांमध्ये चर्चांना उधाण आले आहे.

दि. २ एप्रिल ते ८ एप्रिल २०२४ दरम्यान पार पडलेल्या या भव्य सोहळ्यास राज्यभरातून लाखो भाविकांनी उपस्थिती लावली होती. नाशिक जिल्ह्यात प्रथमच झालेल्या या वैकुंठगमन सोहळ्यामुळे भरवस




फाटा परिसराला राज्यस्तरीय ओळख मिळाली होती. आठ दिवस चाललेल्या कार्यक्रमात महाप्रसाद, कीर्तन-प्रवचन, आरोग्य शिबिरे, कृषी प्रदर्शन तसेच विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्वांसाठी मोठ्या प्रमाणावर देणग्या, वर्गणी आणि अन्नदान जमा करण्यात आले होते.

मात्र, कार्यक्रम संपून दोन वर्षे उलटूनही आयोजक समितीकडून सार्वजनिक आर्थिक हिशोब जाहीर करण्यात आलेला नसल्याची चर्चा आता रंगू लागली आहे. किती पावती पुस्तके छापण्यात आली? एकूण किती निधी जमा झाला? पादुकांवर किती देणग्या प्राप्त झाल्या? खर्च नेमका कोणत्या कामांवर झाला? अधिकृत लेखापरीक्षण झाले का? तसेच शिल्लक निधी असल्यास त्याचा वापर कशासाठी होणार? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

दरम्यान, लातूर येथे याच धर्तीवरील एका कार्यक्रमात आर्थिक गैरव्यवहाराच्या चर्चेनंतर भरवस फाटा येथील सोहळ्याच्या व्यवहारांबाबतही पारदर्शकतेची मागणी अधिक तीव्र झाली आहे.

श्रद्धा आणि जनविश्वास टिकवण्यासाठी आयोजक समितीने अधिकृत हिशोब जाहीर करावा, अशी भावना भाविकांकडून व्यक्त होत आहे.

सोहळ्याचे नियोजन आणि अंमलबजावणीबद्दल त्या वेळी आयोजक समितीचे सर्वत्र कौतुक झाले होते. मात्र, भविष्यात अशा धार्मिक कार्यक्रमांबाबत कोणतीही शंका निर्माण होऊ नये आणि भाविकांचा विश्वास अधिक दृढ व्हावा यासाठी आर्थिक व्यवहार पारदर्शकपणे समोर आणणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

आयोजक समितीने लवकरात लवकर अधिकृत लेखाजोखा सादर करावा, अन्यथा धर्मदाय आयुक्तांकडे निवेदन देण्यात येईल, असा इशाराही काही भाविकांनी दिला आहे.

# सह्याद्री करिअर अकॅडमीच्या शंभरच्यावर विद्यार्थ्यांची पोलीस दलात निवड –सत्कार सोहळ्यात पालकांसह गौरव

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : महाराष्ट्र शासनाच्यावतीने नुकत्याच झालेल्या पोलीस भरतीमध्ये बारामती येथील सह्याद्री करिअर अकॅडमीच्या शंभरच्यावर विद्यार्थ्यांची पोलीस दलात निवड झाली. या यशस्वी विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार समारंभ सह्याद्री करिअर अकॅडमीतर्फे आयोजित करण्यात आला.या सोहळ्यात विद्या प्रतिष्ठानचे खजिनदार युगेंद्र पवार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना पवार म्हणाले की, "सह्याद्री करिअर अकॅडमी म्हणजे पोलीस तयार करण्याची एक प्रकारे तालीमच आहे. महाराष्ट्राच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात गेलो असतातेथे ; सह्याद्री




करिअर अकॅडमीचा एक तरी विद्यार्थी पोलीस झालेला असतोच."

ते पुढे म्हणाले की, उमेश रुपनवर सर धनाजी रुपनवर सर व त्यांच्या सहकारी मंडळी पोलीस भरतीसाठी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट प्रशिक्षण देत आहेत. पोलीस भरतीचे शिक्षण घेत असताना आई-वडिलांचे कष्ट प्रत्येक विद्यार्थ्यांनी जाणणे गरजेचे आहे.मुलांबरोबर मुलींचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे समाधानही त्यांनी व्यक्त केले.

या सत्कार सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला असून पालकांनीही आपल्या मुलांच्या यशाचा अभिमान व्यक्त केला.सह्याद्री करिअर अकॅडमीच्या या यशस्वी कामगिरीमुळे बारामतीत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# कर्जत तालुक्यामध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचे थैमान!

**दैनिक युवक आधार**

**ता कर्जत / वैभव गायकवाड** : आज दिनांक ७ मे रोजी संपूर्ण कर्जत तालुक्यामध्ये अवकाळी पावसाने हजेरी लावली. या अकाली आलेल्या पावसामुळे सर्वांची एकच तारांबळ उडाली. अतिशय वेगवान वारा वाहू लागल्याने सर्वांची धावपळ होऊ लागली. मे महिन्याच्या सुरुवातीलाचं ह्या अवकाळी पावसाचा मारा सुरु झाला.

सकाळपासूनच उन्हाची धग वाढली होती व अचानक दुपारी १ वाजल्यापासुन सोसाट्याचा वारा वाहू लागला, ढग दाटून आले आणि मुसळधार पावसाला सुरुवात झाली. रस्त्यावरील प्रवासी मिळेल तिथे अडोसा घेऊन पाऊस थांबण्याची वाट पाहत होते. दुपारी १ वाजल्यापासून पाऊस पडू लागला असून तो थांबणायचे कोणतेही संकेत दिसत नसल्याने अनेकांचे हाल झाले. गेले दोन-अडीज महिने उकड्याने हैराण नागरिकांना बराच दिलासा मिळाला.

कर्जत, भिवापूरी रोड, नेरळ, शेलू व वांगणी या संपूर्ण भागात मुसळधार पावसाने धुमाकूळ घातला. लहान मुलांनी शाळेची मे महिन्याची सुट्टी असल्याने पावसात भिजण्याचा आनंद घेतला. उन्हाने त्रस्त सर्व सजीवांना गरव्याचा सुखद आस्वाद घेता आला. परंतु शेतकरी वर्ग मात्र चिंतेत दिसत आहे. रब्बी हंगामातील पिकांच्या होणाऱ्या नुकसानीमुळे शेतकरी राजा हावालदिल पाहावयास मिळाला.

# जगाचा पोशिंदा : हतबल की कणखर ?

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : भारत हा कृषिप्रधान देश म्हणून जगभरात ओळखला जातो."जय जवान,जय किसान"ही घोषणा आपल्या राष्ट्रीय अभिमानाचा भाग आहे.जवान सीमेवर देशाचे रक्षण करतात तर शेतकरी आपल्या घामाने संपूर्ण समाजाचे पोट भरतात. म्हणूनच शेतकऱ्याला "जगाचा पोशिंदा"म्हटले जाते.मात्र आज तोच पोशिंदा हतबल झालेला दिसत आहे ?

नैसर्गिक आपत्ती,पिकांचे कवडीमोल भाव, बाजारातील अस्थिरता आणि हमीभावाचा अभाव यामुळे शेतकरी संकटात सापडतो. दिवसेंदिवस शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची संख्या वाढत आहे, आणि हे एका कृषिप्रधान देशात घडते आहे, ही बाब समाजाला विचार करायला भाग पाडते.

गॅस संपला तर लोकांना जगणे कठीण वाटते,मग अन्नच पिकले नाही तर काय होईल?स्वतःच्या घरात अन्न कमी पडले तरी दुसऱ्यांच्या घरात अन्न पोहोचवणारा म्हणजे शेतकरी. ऊन,वारा, पाऊस यांची पर्वा न करता शेतकरी राबतो आणि फक्त ५-१०% नफ्याच्या आशेवर जगतो. निसर्गाला दोष न देता पुन्हा नव्या जोमाने शेतात



उतरतो,ही त्याची कणखरता आहे.

शेतकरी केवळ पिके पिकवणारा नाही,तर समाजाचा आधारस्तंभ आहे. त्यांच्या कष्टाचे मोल पैशात होऊ शकत नाही.गरज आहे ती आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्याची,त्यांच्या मालाला योग्य हमीभाव मिळवून देण्याची आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांना समाजात सन्मानाचे स्थान देण्याची.

शेतकरी सुखी तर जग सुखी – हीच खरी जाणीव समाजाने ठेवली पाहिजे. शेतकऱ्याच्या कष्टाला योग्य सन्मान मिळणे हा त्यांचा अधिकार आहे.

जय जवान,जय किसान!

**कु.हर्षदा संजय साळुंके**

# अमरावती ग्रामीणच्या नवनियुक्त पोलीस अधीक्षकांचे आ गजानन लवटे यांनी केले स्वागत

## जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्था व ग्रामीण समस्यांवर सकारात्मक चर्चा

**दैनिक युवक आधार दर्यापूर**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी :** अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षकपदी नवनियुक्त झालेले मा. श्री. निकेतन कदम यांची दर्यापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. गजाननभाऊ लवटे यांनी आज अमरावती येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात सदिच्छा भेट घेतली.

यावेळी आमदार लवटे यांनी पुष्पगुच्छ देऊन श्री. कदम यांचे अमरावती जिल्ह्यात सहर्ष स्वागत केले व त्यांना नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या.

भेटीत या विषयांवर झाली चर्चा:

भेटीदरम्यान जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासोबतच ग्रामीण भागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांवर



सविस्तर व सकारात्मक चर्चा झाली. दर्यापूरसह संपूर्ण ग्रामीण भागातील अवैध धंदे, वाहतूक कोंडी, महिला सुरक्षेचा प्रश्न आणि शेतकऱ्यांशी संबंधित गुन्ह्यांवर आळा घालण्यासाठी पोलिसांनी अधिक तत्पर राहावे, अशी अपेक्षा आमदार लवटे यांनी व्यक्त केली.

यावर बोलताना नवनियुक्त पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी, "अमरावती ग्रामीणमधील जनतेला न्याय मिळवून देणे व जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्था अधिक बळकट करणे हे माझे प्राधान्य असेल. नागरिकांनी कोणत्याही समस्येसाठी थेट पोलीस प्रशासनाशी संपर्क साधावा," असे आश्वासन दिले.

श्री. निकेतन कदम यांनी अलीकडेच अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक म्हणून पदभार स्वीकारला आहे. यापूर्वी त्यांनी विविध जिल्ह्यांमध्ये महत्त्वाच्या पदांवर काम केले असून त्यांची कार्यपद्धती कडक शिस्तीची व जनताभिमुख मानली जाते.

या भेटीमुळे पोलीस प्रशासन आणि लोकप्रतिनिधींमधील समन्वय अधिक दृढ होऊन ग्रामीण भागातील प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

आमदार लवटे यांनी श्री. कदम यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

# एरंडोल येथे जनगणना २०२७ हायटेक स्वगणनेला उत्साहवर्धक प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**एरंडोल (जळगाव)** : भारताच्या पहिल्या पूर्णपणे डिजिटल जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यात एरंडोल नगरपरिषद क्षेत्रात हायटेक स्वगणना (Self Enumeration) ला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे.

एरंडोल नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, https://se.census.gov.in या अधिकृत पोर्टलवरून हजारो कुटुंबांनी स्वतःची माहिती ऑनलाइन भरत आहे. मोबाइल नंबरद्वारे OTP व्हेरिफिकेशन, घराचे लोकेशन मॅपवर मार्क करणे आणि प्रश्नांची सोपी प्रक्रिया यामुळे नागरिकांना घरी बसून आरामात जनगणना प्रक्रियेत सहभागी होता आले.

एरंडोल नगरपरिषदेचे मुख्याधिकारी म्हणाले, "स्वगणनेमुळे पारंपरिक गणकांच्या भेटीवेळी फक्त SE ID देऊन काम पूर्ण होईल. यामुळे वेळेची बचत होईल आणि डेटा अधिक अचूक राहील. एरंडोलमध्ये डिजिटल




साक्षरता आणि जागरूकता चांगली आहे, त्यामुळे प्रतिसाद उत्साहवर्धक आहे."

**नागरिकांच्या प्रतिक्रिया:**

"खूप सोपी प्रक्रिया आहे. १५-२० मिनिटांत पूर्ण झाली. आता गणक येईल तेव्हा फक्त ID द्यायची," असे एरंडोलमधील रहिवासी श्री. राजेश महाजन,गोपाल सोनार,दिपक पाटील यांनी सांगितले.

अनेक महिलांनी आणि युवकांनीही या सुविधेची प्रशंसा केली.जनगणना २०२७ ही 'जनगणना से जन कल्याण' या थीमवर चालली असून, स्वगणना ही पहिली पायरी आहे. यानंतर १६ एप्रिलपासून घरगुती भेटी (Houselisting) सुरू झाल्या आहेत.

नगराध्यक्ष श्री नरेंद्र ठाकूर ,स्थानिक नगरसेवक, पदाधिकारी ,जनगणना ऑफिसर श्री ठाकूर साहेब ,श्री हितेश जोगी अधिकाऱ्यांनी अद्याप स्वगणना न केलेल्या नागरिकांना पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे.

एरंडोलसारख्या शहरातही डिजिटल जनगणनेचा यशस्वी प्रयोग हा महाराष्ट्रासाठी आणि देशासाठी एक चांगला संदेश आहे. यामुळे विकास योजना, आरोग्य, शिक्षण आणि इतर सुविधा नियोजन अधिक प्रभावी होणार आहे.

# "जनगणना २०२७ साठी प्रशासन ॲक्शन मोडमध्ये; मानोरा–कारंजा प्रशिक्षणाची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी"

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** मे देशाच्या विकासाचा आराखडा ठरविणाऱ्या जनगणना २०२७ प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर प्रशासन पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आले असून, या महत्त्वपूर्ण उपक्रमाची अचूक व वेळेत अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी यंत्रणा सज्ज होत आहे. या अनुषंगाने मानोरा व कारंजा येथे आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमांची जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी प्रत्यक्ष भेट देऊन सखोल पाहणी करत कामकाजाचा आढावा घेतला.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशिक्षण केंद्रांमध्ये सुरू असलेल्या कार्यपद्धतीची बारकाईने तपासणी केली. प्रशिक्षणार्थींशी थेट संवाद साधत त्यांनी माहिती संकलन प्रक्रियेतील सूक्ष्म बाबी, डिजिटल प्रणालीचा प्रभावी वापर, तसेच क्षेत्रीय पातळीवर काम करताना येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाययोजना याबाबत मार्गदर्शन केले. जनगणना ही केवळ आकडेवारी नसून शासनाच्या धोरणनिर्मितीचा पाया असल्याने प्रत्येक माहिती अचूक



आणि विश्वासार्ह असणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रशिक्षणादरम्यान डेटा संकलनातील अचूकता, नोंदणीतील शिस्त, वेळेचे नियोजन आणि विविध विभागांतील समन्वय यावर विशेष भर देण्यात आला. कोणतीही त्रुटी किंवा हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा देत जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी, असे सांगितले.

तसेच, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून माहिती संकलन अधिक वेगवान आणि पारदर्शक करण्याचे निर्देश देण्यात आले. डिजिटल प्रणालीच्या सहाय्याने होणारी माहिती नोंदणी ही त्रुटीरहित आणि तत्काळ उपलब्ध होण्यासाठी प्रशिक्षणात शिकविलेल्या बाबींची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याचेही त्यांनी सांगितले.

मानोरा व कारंजा येथील प्रशिक्षणाची एकूण तयारी समाधानकारक असल्याचे निरीक्षण नोंदवत, पुढील टप्प्यातील काम अधिक वेगाने आणि परिणामकारक पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले. यामुळे आगामी काळात जनगणना प्रक्रिया अधिक शिस्तबद्ध व सुरळीत पार पडेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या पाहणी दौऱ्यात उपविभागीय अधिकारी कैलास देवरे, तहसीलदार रवी महाले यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, प्रशिक्षणार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनगणना २०२७ यशस्वी करण्यासाठी प्रशासनाची कंबर कसली असून, अचूक माहितीच भविष्यातील विकासाची दिशा ठरवणार आहे.

## विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजीची भीती दूर करण्यासाठी कार्यशाळा घेणार - प्राचार्य निळकंठ बोरोळे यांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर :** अडुळा बाजार, "इंग्रजी ही केवळ विषय नाही, तर जागतिक स्तरावर संवादाचे व संधींचे दार उघडणारी किल्ली आहे. विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजी विषयाची अनाठायी भीती दूर करण्यासाठी प्रसंगी विशेष कार्यशाळा घेणार," असे प्रतिपादन इंग्रजी विषयाचे गाढे अभ्यासक, राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक व प्राचार्य निळकंठ बोरोळे यांनी केले.

येथील माध्यमिक विद्यालयात आयोजित आरोग्य, शिक्षण व क्रीडा विषयक शिबिरामध्ये 'स्पोकन इंग्रजी' या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते.



**चार कौशल्यांवर भर देण्याची गरज**

प्राचार्य बोरोळे पुढे म्हणाले, "आजच्या माहिती तंत्रज्ञान, व्यवसाय आणि स्पर्धेच्या युगात इंग्रजी भाषेचे सखोल ज्ञान प्रत्येकाला गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना ऐकणे (Listening), बोलणे (Speaking), वाचणे (Reading) आणि लिहिणे (Writing) या चार मूलभूत कौशल्यांमध्ये पारंगत करून त्यांना दैनंदिन जीवनात प्रभावी संवाद साधण्याची कला अवगत झाली पाहिजे. यातूनच साहित्याविषयी आवड निर्माण होईल आणि जागतिक स्तरावर करिअर व उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध होतील."

इंग्रजी विषय कठीण असल्याचा न्यूनगंड विद्यार्थ्यांनी मनातून काढून टाकावा. सोप्या पद्धती, खेळ, गटचर्चा आणि दैनंदिन वापरातील वाक्यांमधून इंग्रजी आत्मसात करता येते, असे त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले.

**दर शनिवारी विशेष कार्यशाळेचा संकल्प**

या मार्गदर्शन कार्यक्रमात एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. पुढील शैक्षणिक सत्रापासून दर शनिवारी विद्यालयातील व परिसरातील विद्यार्थ्यांसाठी 'स्पोकन इंग्लिश व व्यक्तिमत्व विकास' विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्याचा संकल्प उपस्थित मान्यवरांनी केला. या कार्यशाळेतून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यास मदत होणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव व राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक प्रदीप लांडे होते. यावेळी महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त व प्रसिद्धी प्रमुख गजानन करुले, संचालक हरिदास कविटकर, मुख्याध्यापक बी. एल. हाडोळे, ज्येष्ठ शिक्षिका कु. निता मळसने, अनिल शामतकर आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन जुनगरे यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अनिल तायडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भानुदास मावळे व प्रदीप कंटाळे यांनी विशेष सहकार्य केले.

विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा आणि इंग्रजीवर प्रभुत्व मिळवून आपले भविष्य उज्ज्वल करावे, असे आवाहन शेवटी प्राचार्य बोरोळे यांनी केले.

### खुल्लोडचे भूमिपुत्र सचिन घुगे यांचा भव्य नागरी सत्कार

## पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल जल्लोष; हलगीच्या कडकडाटात निघाली मिरवणूक

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख छत्रपती संभाजीनगर**

सिल्लोड:-तालुक्यातील खुल्लोड येथील भूमिपुत्र सचिन घुगे यांची महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) पदी निवड झाल्याबद्दल खुल्लोड ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. ग्रामीण भागातील तरुण पोलीस दलात अधिकारी झाल्याने संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सत्कार सोहळ्यानिमित्त गावातून सचिन घुगे यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी हलगी वादकांचा कडकडाट विशेष आकर्षण



ठरले. गावातील विविध कुटुंबांनी सचिन घुगे यांचे औक्षण करून शाल व श्रीफळ देऊन सन्मानित केले. या सोहळ्याची सांगता श्री येतुळबा महाराज मंदिर परिसरात झाली. गावकऱ्यांच्या वतीने परमानंद वाघ सर यांनी अभिनंदन पर भाषण केले.

या सोहळ्याला सामाजिक कार्यकर्ते चंद्रभान हुसे, उपसरपंच नरसिंह वाघ, तंटामुक्ती अध्यक्ष कैलास वाघ, भाजपा नेते बाळासाहेब माणिकराव वाघ, रामेश्वर वाघ सर, मंगेश घुगे सर, तुकाराम घुगे, माजी सरपंच प्रभाकर घुगे, रामेश्वर देवाजी घुगे, ज्ञानेश्वर कारभारी वाघ, विजय कारभारी घुगे सर, व्यापारी मनोज घुगे, कृष्णा शामराव वाघ, बाळासाहेब उत्तम वाघ, सामाजिक कार्यकर्ते योगेश त्र्यंबक वाघ, शकुनात शेषराव वाघ व ग्रामस्थ मंडळी, युवक आणि महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. आभार प्रदर्शन संजय घुगे, कृष्णा घुगे व स्वतः सचिन घुगे यांनी मानले.

# देगलूर नगरपरिषदेत शहिद सचिन वनंजे यांना अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी/महादेव उप्पे** : देगलूर (दि.०८) देगलूर भुमिचे सुपुत्र ऑपरेशन सिंदूर मध्ये देशसेवेत कर्तव्य बजावत असताना वीरमरण आलेले शहिद जवान सचिन यादवराव वनंजे यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनाचे देगलूर नगरपरिषदेच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करून शहिद जवानांचे स्मरण करून त्यांना मान्यवरांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले आहे.देगलूर तालुक्यातील भुमिपूत्र शहिद जवान सचिन यादवराव वनंजे यांचे मागील वर्षी "ऑपरेशन सिंदूर " युध्दात देशसेवेत कर्तव्य बजावत असताना जम्मू काश्मिर येथे त्यांना वीरमरण आले होते. युध्द परस्थितीमुळे देशांतर्गत विमानसेवा बंद असल्याने दि.९ मे २०२५ रोजी त्यांचे पार्थिव देगलूर येथे पोहोचले असता शासनाच्या वतीने त्यांचे पार्थिवावर नगरपरिषदेच्या बाजूच्या जागेवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले



होते.भारतीय सैन्य दलातील जवान सचिन वनंजे यांनी देशसेवेत आपले बलिदान दिले.

दि.६ मे बुधवार रोजी सकाळी ९ वाजता देगलूर नगरपरिषदेच्या सभागृहात प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्ताने शहिद जवानांचे स्मरण व अभिवादन कार्यक्रम आयोजित करून शहिद जवान सचिन वनंजे यांच्या प्रतिमेला त्यांचे आई-वडिल कलावती यादवराव वनंजे,नगराध्यक्षा प्रतिनिधी बालाजी टेकाळे,उपनगराध्यक्ष ॲड.अंकुश देसाई,मा.उपनगराध्यक्ष लक्ष्मीकांत पदमवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तर देगलूरच्या माजी सैनिक संघटनेचे अनिल वट्टमवार,व्यंकट अनमुलवार,शेख शब्बीर,रामलू कोयलकोंडवार,रमेश कांबळे यांनी राष्ट्रगीत म्हणून सलामी दिली.

याप्रसंगी माजी नगराध्यक्ष विवेक केरूरकर,नगरसेवक तथा सभापती सुमंत कांबळे,एकनाथ टेकाळे,अनिल बोन्लावार,नंदूशेट शाखावार,चंद्रकांत मोरे,द्याडे,देवेंद्र मोतेवार,दिगंबर कौरवार व्यंकट कांबळे,दिगंबर कडलवार,धोडिंबा कांबळे,रमेश सोनकांबळे,सय्यद मोहियोद्दीन,पाशाभाई बाटको,सुशिलकुमार देगलूरकर,पें.संजय कांबळे, सतिश पांडवे,पो.उपनिरिक्षक महाजन मैसनवाड,सचिन कांबळे,सुमित कांबळे,यादव फिंरगे,गजुभाऊ कांबळे,संतोष उनग्रतवार यांच्यासह सर्व नगरसेवक शहीद सचिन वनंजे यांचे कुंटुबीय नगरपरिषदचे अधिकारी कर्मचारी शहरातील व्यापारी शहरातील विविध संघटनेत व पक्षात काम करणारे नागरिक व देगलूर शहर वासीय उपस्थित होते.

# नैताळेच्या गौरव साठे यांचे एमपीएससी परीक्षेत घवघवीत यश

### महसूल सहाय्यक पदावर निवड; परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : निफाड तालुक्यातील नैताळे येथील युवक गौरव राजेंद्र साठे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत महसूल सहाय्यक पदावर निवड मिळवली आहे. त्यांच्या या यशामुळे नैताळे गावासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

गौरव साठे यांचे प्राथमिक शिक्षण इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत जिल्हा परिषद शाळा, नैताळे येथे झाले. त्यानंतर इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण त्यांनी वैनतेय विद्यालय, निफाड येथे पूर्ण केले. पुढे अकरावीपासून पदवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी केटीएचएम महाविद्यालय येथे घेतले. वाणिज्य शाखेतून त्यांनी पदवी संपादन केली.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर गौरव यांनी चार वर्षे खासगी कंपनीत नोकरी केली. मात्र, शासकीय सेवेत कार्य करण्याचे स्वप्न त्यांनी कायम मनाशी जपले होते. त्यासाठी त्यांनी नोकरीचा राजीनामा देत एमपीएससी परीक्षेच्या



तयारीला सुरुवात केली. या काळात त्यांना कुटुंबीयांसह मित्रपरिवाराचे मोठे सहकार्य लाभले. सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर परिश्रम आणि प्रबळ इच्छाशक्तीच्या बळावर त्यांनी अखेर हे यश मिळवले.

आपल्या यशाचे श्रेय गौरव यांनी आई मिनाताई साठे, वडील राजेंद्र साठे, आजी इंदुबाई साठे, आजोबा गंगाधर साठे, लहान भाऊ बंटी साठे तसेच मित्रपरिवाराला दिले आहे. "पहिलीपासून पदवीपर्यंत मी एक सामान्य विद्यार्थी होतो; मात्र कुटुंबीयांचे प्रोत्साहन आणि स्वतःची मेहनत यामुळेच हा टप्पा गाठता आला," अशी भावना गौरव साठे यांनी व्यक्त केली. गौरव साठे यांच्या यशामुळे नैताळे गावाच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात अभिमानाची भावना निर्माण झाली असून, अनेक तरुणांना त्यांच्या यशातून प्रेरणा मिळत आहे

## पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** अल्पवयीन मुलीला माझ्यावर प्रेम कर, माझ्याशी बोल नाहीतर मी जीव देईन आणि तुझा सुद्धा जीव घेईन अशी धमकी दिल्याप्रकरणी आरोपी आकाश उमेश सोनगिरे (वय 21 रा. मुरबी गाव, सेक्टर 19) याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात सहा मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. फेब्रुवारी 2026 पासून 5 मे पर्यंत आकाश सोनगिरे याने अल्पवयीन मुलीला माझ्यावर प्रेम कर, माझ्याशी बोल, नाहीतर मी जीव देईन आणि तुझा सुद्धा जीव घेईन अशी धमकी दिली आणि तिला घाबरवले.

# प्रशासनाचे 'झोपेचे सोंग', जनतेचे मात्र हाल माळआसोली-मोहदरी रस्त्याची झाली चाळण!

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड (मोहदरी)** : माळआसोली फाटा ते मोहदरी फाटा या मुख्य रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना नरकयातना सहन कराव्या लागत आहेत. विशेष म्हणजे, रस्त्याच्या दुरुस्तीसाठी लागणारी गिट्टी गेल्या दोन महिन्यांपासून रस्त्याच्या कडेला आणून टाकण्यात आली आहे, मात्र प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही. या प्रकारामुळे "प्रशासन झोपेचे सोंग घेत आहे का?" असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.माळआसोली आणि मोहदरी फाटा जोडणारा हा रस्ता अनेक गावांसाठी दळणवळणाचा मुख्य दुवा आहे. मात्र,



सध्या या रस्त्यावर डांबराचा शोध घ्यावा लागत असून जागोजागी मोठे खड्डे पडले आहेत. दुचाकीस्वारांना तर या रस्त्यावरून चालणे म्हणजे जीवावरची कसरत ठरत

**आम्ही कर भरतो, मग आम्हाला साधे रस्तेही का मिळत नाहीत आम्हाला नेहमी दवाखान्यासाठी, बाजारासाठी, विविध कामासाठी धनज, मुळावा, मोहदरी या ठिकाणी जावे लागते आज दोन महिने झाले गिट्टी पडून आहे, पण काम सुरू व्हायला मुहूर्त नाहीये. जर येत्या काही दिवसांत रस्ता दुरुस्त झाला नाही, तर आम्ही तीव्र आंदोलन करू.**

**नंदलाल नेखर**
**ग्रामस्थ माळआसोली**

आहे.या रस्त्याचे काम सुरू होईल या आशेने नागरिक गेल्या दोन महिन्यांपासून वाट पाहत आहेत. रस्त्याच्या कडेला गिट्टीचे ढिगारे आणून टाकले आहेत, परंतु कंत्राटदार किंवा संबंधित विभागाने अद्याप कामाचा श्रीगणेशा केलेला नाही. हे साचलेले गिट्टीचे ढिगारे उलट वाहनधारकांसाठी अधिक धोकादायक ठरत आहेत, कारण अरुंद रस्त्यावर गिट्टी पसरल्याने गाड्या घसरण्याचे प्रकार घडत आहेत.एकीकडे सरकार ग्रामीण रस्ते विकास योजनेच्या गप्पा मारत असताना, दुसरीकडे प्रत्यक्ष जमिनीवर परिस्थिती भीषण आहे. नागरिकांनी वेळोवेळी तक्रार करूनही संबंधित बांधकाम विभागाकडून केवळ आश्वासने दिली जात आहेत. कामाला उशीर होत असल्याने लोकांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला आहे.

## मातोश्री विद्यालयाची सानिका अविनाश राऊत एच एस सी परीक्षेत महागाव तालुक्यात प्रथम

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव (यवतमाळ )** : शैक्षणिक सत्र 2025 26 फेब्रुवारी मार्च मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक शाळांत प्रमाणपत्र परीक्षेत सानिका अविनाश राऊत हिने 92.67%गुण मिळवून तालुक्यात प्रथम येण्याचा मान मिळविला. सानिकाने आपले शिक्षण पूर्व प्राथमिक पासून इयत्ता बारावी पर्यंत कोणत्याही प्रकारचे शिकवणी वर्ग न लावता मातोश्री विद्यालयातून पूर्ण केले आहे तिने आपल्या अभ्यासाचे



कु. सानिका अविनाश राऊत
92.67 %
MATH-98, CHEM- 94, BIO-93

नियोजन व शिक्षकांचे मार्गदर्शन अभ्यासात चिकाटी जिद्द ठेवून सदर परीक्षेत यश संपादन केले आहे ती आपल्या यशाचे श्रेय प्राचार्य व शिक्षक वृंद व पालक यांना देते विद्यालयाच्या वतीने पालकासमवेत सत्कार करून तिला पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## माणुसकीच्या नात्याने जपलेलं लोकनेतेपद : माजी आ. संदीप धुर्वे यांची लोकप्रियता आजही कायम

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी - महेश पेन्दोर** : राजकारणामध्ये निवडणुका येतात आणि जातात, कुणाला उमेदवारी मिळते तर कुणाची हुकते, पण जनतेच्या मनातील स्थान हे केवळ सत्तेवर अवलंबून नसते. हेच वास्तव माजी आमदार संदीप भाऊ धुर्वे यांच्या बाबतीत पुन्हा एकदा प्रकर्षाने दिसून आले आहे. पक्षाकडून उमेदवारी मिळाली नसली तरी संदीप भाऊंच्या लोकप्रियतेत कोणतीही घट झालेली नाही, उलट लोकांचा त्यांच्यावरील विश्वास अधिकच दृढ झाला आहे.



संदीप भाऊंनी निर्माण केलेले नाते हे केवळ राजकीय फायद्यापुरते मर्यादित नसून ते माणुसकीच्या घट्ट धाग्यांनी विणलेले आहे. कोणाच्याही सुख-दुःखात धावून जाणे, आपुलकीने विचारपूस करणे आणि सामान्यातल्या सामान्य माणसाशी मनापासून जोडलेलं राहणे, या त्यांच्या स्वभावामुळे त्यांनी लोकांच्या हृदयात कायमचे घर केले आहे. नुकतेच सावळी सदोबा येथील सुरेश पवार, आयता येथील सुरेश महल्ले आणि सावळी सदोबा येथीलच डॉ. संजय कापसे यांच्या मातोश्रींचे निधन झाले. या कठीण प्रसंगी संदीप भाऊंनी या तिन्ही कुटुंबांच्या घरी जाऊन सांत्वनपर भेट दिली. त्यांच्या या उपस्थितीने दुःखात असलेल्या कुटुंबांना मोठा मानसिक आधार मिळाला.

राजकीय परिस्थिती कोणतीही असली किंवा पदे असोत वा नसोत, परिसरातील नागरिक, कार्यकर्ते आणि समर्थकांच्या मनात संदीप भाऊंबद्दल आजही तोच सन्मान आणि अपार विश्वास आहे. लोकांशी असलेला हा जिव्हाळा आणि अहोरात्र जपलेला संपर्क यामुळेच राजकीय घडामोडींचा त्यांच्या प्रतिमेवर कोणताही परिणाम झालेला नाही. आजही जनतेच्या मनातील त्यांची जागा तितकीच भक्कम आणि अढळ असल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. थोडक्यात सांगायचे तर, उमेदवारीपेक्षा त्यांनी कमावलेली माणसं हीच त्यांची खरी ताकद ठरली आहे.

# मलकापूर येथे महाराष्ट्र एक्सलन्स अवॉर्ड 2026 वितरण समारंभ संपन्न

**दैनिक युवक आधार संपादक संतोष आमले** : डिजिटल प्रेस क्लब ऑफ इंडिया च्या वतीने महाराष्ट्र निमित्य आयोजित महाराष्ट्र एक्सलन्स अवॉर्ड 2026 कार्यक्रम मलकापूर येथील डॉ. हेडगेवार सभागृह येथे आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमात महाराष्ट्राचे कानाकोपऱ्यातील आलेल्या विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा सत्कार करण्यात आला .

आंतरराष्ट्रीय मानांकन आयएसओ 9001_2015 प्रमाणित प्रेस क्लब ऑफ इंडिया च्या वतीने विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्याच्या उद्देशाने व त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र एक्सलन्स अवॉर्ड 2026 चे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रस्ताव ऑनलाइन मागवण्यात आले होते

त्यावेळी 543 प्रस्तावांपैकी निवड करून 165 मान्यवरांना महाराष्ट्र एक्सलन्स पुरस्कार 2026 प्रदान करण्यात आला. तसेच शिक्षण क्षेत्रात बहुमूल्य कार्य करणाऱ्या 110 शिक्षकांचा सुद्धा महाराष्ट्र एक्सलन्स अवॉर्ड देऊन गौरव करण्यात आला.




महाराष्ट्र एक्सलन्स अवॉर्ड 2026 पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एन बी शिंदे साहेब (शिक्षण विस्तार अधिकारी) , कार्यक्रमाचे उद्घाटक वैभव आढाव प्राचार्य फार्मसी कॉलेज, तर प्रमुख पाहुणे धनश्रीताई काटीकर पाटील महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हिंदी मराठी पत्रकार संघ, काळपांडे मॅडम प्राचार्य चांडक विद्यालय , बाळासाहेब दामोदर उद्योजक , दामोदर शर्मा शेतकरी संघटना , विजय डागा, रंजीत डोसे, गोविंद जाधव सर, विकास शिंदे सर, निवृत्ती निंबोडे सर उप मुख्याध्यापक ,संजय सावळे आदर्श शिक्षक, सुरेश उतपूरे आदर्श शिक्षक, हे होते

कार्यक्रमाची सुरुवात आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर व प्रथम महिला संपादक तानुबाई बिरजे यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.

कार्यक्रमात पत्रकारिता, शिक्षण, सामाजिक ,राजकीय ,कला, वैद्यकीय, उद्योजक, क्रीडा अशा अनेक क्षेत्रातील कर्तुत्वान व्यक्तींचा सत्कार महाराष्ट्र एक्सलन्स अवॉर्ड 2026 देऊन करण्यात आला.


कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र गंणगे सर यांनी तर आभार प्रदर्शन श्रीकृष्ण तायडे यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. प्रकाश थाटे, सुधाकर तायडे, मयूर लड्डा, कैलास काळे, शेख निसार , शेख ताहेर , विनायक तळेकर, प्रदीप इंगळे, भाऊराव व्यवहारे , सुनील देशमुख, अमोल वानखेडे, किशोर सोनवणे, सोनाली ठाकूर, सरस्वती तायडे यांनी परिश्रम घेतले

## पालोद शिवारात बिबट्याची धास्ती ॥

## उसाच्या फडातील झाडावर दिसला वन्यजीव; फोटो व्हायरल, वनविभागाचे पाहणीचे आश्वासन

**दैनिक युवक आधार योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख छत्रपती संभाजीनगर :** सिल्लोड-तालुक्यातील पालोद येथील खेळणा( माणिक सागर) मध्यम प्रकल्प परिसरातील पालोद शिवारात गेल्या तीन ते चार दिवसांपासून एका हिंस्र वन्यप्राण्याचे दर्शन घडत असल्याने शेतकरी वर्गात मोठी धास्ती पसरली आहे. दररोज सकाळी आणि संध्याकाळच्या सुमारास या भागात वन्यप्राण्याचा वावर असल्याचे स्थानिक शेतकऱ्यांनी सांगितले. बुधवारी (दि. ६) सायंकाळी एका संबंधित शेतकऱ्याने उसाच्या शेतातील एका झाडावर बसलेल्या या प्राण्याचे छायाचित्र आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात टिपले. हा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने परिसरात खळबळ उडाली असून, वनविभागाने या प्रकरणाची



दखल घेत तातडीने प्रत्यक्ष पाहणी करण्याचे आश्वासन दिले आहे.

प्रत्यक्षदर्शींच्या मते 'बिबट्याच'

कॅमेऱ्यात कैद झालेला हा प्राणी नेमका बिबट्या आहे की अन्य कोणताही मार्जार कुळातील हिंस्र वन्यजीव, याबाबत सध्या परिसरात विविध तर्कवितर्क लावले जात आहेत. मात्र, ज्या प्रत्यक्षदर्शी शेतकऱ्यांनी या प्राण्याला डोळ्यांनी पाहिले आहे, त्यांनी हा प्राणी 'बिबट्या'च असल्याचा दावा केला आहे. उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे वनक्षेत्रातील नैसर्गिक जलस्रोत आटल्याने वन्यजीव पाण्याच्या शोधात मानवी वस्ती व शिवारातील जलस्रोतांकडे सरकत असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. पालोद शिवारात उसाचे क्षेत्र मोठे असून, दाट झाडीमुळे वन्यजीवांना लपण्यासाठी सुरक्षित आश्रय मिळत आहे.

या संदर्भात वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, त्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेतली असल्याचे सांगितले. वनविभागाचे पथक लवकरच प्रत्यक्ष घटनास्थळाची पाहणी करणार असून 'पगमार्क' (पाऊलखुणा) व इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे सदर प्राण्याची अधिकृत ओळख पटवली जाईल. तोपर्यंत कॅमेऱ्यात दिसणारा प्राणी बिबट्याच आहे की अन्य वन्यजीव, हे तांत्रिकदृष्ट्या स्पष्ट होणे बाकी आहे. वनविभागाची अधिकृत पाहणी पूर्ण होईपर्यंत शेतकऱ्यांनी शेतात जाताना खबरदारी घ्यावी व प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात आले आहे.वनविभागाने केवळ माहिती न घेता प्रत्यक्ष गस्त वाढवावी आणि आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पालोद येथील ग्रामस्थांनी केली आहे.

## अवैध उत्खनन करणाऱ्या जेसीबी मालकाविरुद्ध कठोर कारवाई - जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

### जेसीबी चालक आयुर थोटे याच्यावर गुन्हा दाखल व अटक

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर** : कुही तालुक्यातील वेलतूर पोलीस स्टेशन अंतर्गत मौजा बोरी (नाईक) येथे अवैध मुरुम/माती उत्खनन व वाहतुकीच्या कारवाईमध्ये नायब तहसिलदार बुद्धभूषण निकाळजे यांनी मोठे धैर्य दाखवून रंगेहात पकडलेल्या जेसीबीचा मालक व चालक आयुर थोटे याला अटक करुन त्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिनांक 5 मेच्या रात्री घडलेल्या या थरारक घटनेत नायब तहसिलदार निकाळजे यांनी धैर्य दाखवून केलेल्या कारवाईबद्दल जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कौतूक करुन अशा गुन्हेगारांविरुद्ध कठोर कारवाईचे निर्देश दिले.

त्यांनी वरीष्ठ महसूल अधिकाऱ्यांची तातडीची बैठक बोलावून जिल्ह्यात अवैध मुरुम / माती उत्खनन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मोहीम अशीच सुरु ठेवण्याचे स्पष्ट निर्देश दिले. या बैठकीस अपर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, निवासी उपजिल्हाधिकारी अनूप खांडे, सर्व उपविभागीय अधिकारी व जिल्हा खनिकर्म अधिकारी अतुल दोड आदी उपस्थित होते.




अवैध उत्खनन करणाऱ्या जेसीबी चालक-मालक आयुर थोटे याला मौजा बोरी येथे रंगेहात पकडल्यानंतर त्याने वेगाने त्याची जेसीबी तीन किलोमीटर घटनास्थळावरुन दूर नेली. जेसीबीवर कारवाई करण्यासाठी चढलेले नायब तहसिलदार निकाळजे यांनी जीव मुठीत घेऊन जेसीबी चालकाला गाडी थांबविण्यास सांगितले. त्याने बेदरकारपणे गाडी चालवून त्यांच्या बोलण्याकडे लक्ष न देता अप्रत्यक्ष व प्रत्यक्ष त्यांच्या जिविताला धोका निर्माण केला. त्यांना दुखापत करण्याच्या उद्देशाने झालेल्या या हल्ल्याची शासनाने गंभीर दखल घेतली आहे.

आरोपी आयुर थोटे याला वेलतूर पोलिसांनी दि. 6 मे रोजी अटक केली असून त्याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम 303(2), 62 ,132 , 221, 121(1), 109 सह महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम 48(7), 48(8) अन्वये जेसीबी चालक व मालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम 48(7), 48(8) अन्वये JCB चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास व कार्यवाही पोलीस विभाग करत आहे.

# मानवतेची अखंड ज्योत : जागतिक रेड क्रॉस दिन

मानवजातीच्या इतिहासात युद्धे, नैसर्गिक आपत्ती, रोगराई, दुष्काळ आणि विविध संकटांनी नेहमीच माणसाच्या अस्तित्वासमोर मोठे प्रश्न उभे केले आहेत. अशा संकटांच्या काळात मानवतेच्या रक्षणासाठी काही संस्था आणि व्यक्ती देवदूतासारख्या धावून येतात. जगभरात दुःख, वेदना आणि संकटात सापडलेल्या लोकांना आधार देणाऱ्या अशाच महान चळवळीचे नाव म्हणजे रेड क्रॉस होय. दरवर्षी ८ मे हा दिवस 'जागतिक रेड क्रॉस दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस मानवतेची सेवा, सहानुभूती, करुणा आणि निःस्वार्थ वृत्ती यांचे स्मरण करून देणारा दिवस आहे. रेड क्रॉस चळवळीचे संस्थापक हेन्री ड्युनाँ यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस जगभर साजरा केला जातो. त्यामुळे या दिवसाला ऐतिहासिक, सामाजिक आणि मानवी दृष्टिकोनातून विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

मानवतेच्या सेवेसाठी समर्पित असलेल्या रेड क्रॉस चळवळीचा इतिहास अत्यंत प्रेरणादायी आहे. १८५९ साली इटलीतील सोल्फेरिनो येथे फ्रान्स आणि ऑस्ट्रिया यांच्यात भीषण युद्ध झाले. या युद्धात हजारो सैनिक जखमी झाले होते. युद्धभूमीवर जखमी सैनिक वेदनेने तडफडत होते, परंतु त्यांच्यासाठी पुरेशी वैद्यकीय मदत उपलब्ध नव्हती. त्या वेळी स्वित्झर्लंडचे व्यापारी आणि समाजसेवक हेन्री ड्युनाँ तेथे उपस्थित होते. त्यांनी ही भीषण परिस्थिती पाहिली आणि त्यांचे मन व्यथित झाले. त्यांनी स्थानिक लोकांना एकत्र करून जखमी सैनिकांना मदत करण्यास सुरुवात केली. 'टुट्टी फ्रेटेली' म्हणजे 'आपण सर्व भाऊ आहोत' हा संदेश देत त्यांनी मानवतेची एक नवीन दिशा जगासमोर ठेवली.

या अनुभवातून प्रेरित होऊन हेन्री ड्युनाँ यांनी 'अ मेमरी ऑफ सोल्फेरिनो' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकामध्ये त्यांनी युद्धातील अमानुष परिस्थितीचे वर्णन केले आणि युद्धग्रस्तांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वयंसेवी मदतसंस्था स्थापन करण्याची कल्पना मांडली. त्यांच्या या विचारांना जगभरातून प्रतिसाद मिळाला आणि १८६३ साली आंतरराष्ट्रीय रेड क्रॉस समितीची स्थापना झाली. पुढे १८६४ मध्ये जिनिव्हा करार झाला आणि युद्धातील जखमी सैनिकांच्या संरक्षणासाठी काही आंतरराष्ट्रीय नियम निश्चित करण्यात आले. याच क्षणापासून रेड क्रॉस चळवळीचा जागतिक प्रवास सुरू झाला.

रेड क्रॉस चळवळीची सात मूलभूत तत्त्वे ही तिच्या कार्याची खरी ओळख आहेत. मानवता, निष्पक्षता, तटस्थता, स्वातंत्र्य, स्वयंसेवा, एकता आणि सार्वत्रिकता ही तत्त्वे केवळ शब्द नसून मानवतेच्या सेवेसाठी जगणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकाच्या कार्याचे अधिष्ठान आहेत. मानवता हे तत्त्व सर्वांत महत्त्वाचे आहे. कोणत्याही परिस्थितीत माणसाचे दुःख कमी करणे आणि त्याचे जीवन सुरक्षित ठेवणे हे रेड क्रॉसचे प्रमुख उद्दिष्ट आहे. निष्पक्षता म्हणजे जात, धर्म, भाषा, वर्ण किंवा राजकीय विचार न पाहता



सर्वांना समान मदत करणे. तटस्थतेमुळे रेड क्रॉस कोणत्याही राजकीय किंवा लष्करी संघर्षात पक्षपाती भूमिका घेत नाही. त्यामुळेच जगभरातील लोकांचा या संस्थेवर विश्वास टिकून आहे.

रेड क्रॉसचे कार्य केवळ युद्धापुरते मर्यादित नाही. नैसर्गिक आपत्तींच्या काळातही ही संस्था मोठ्या प्रमाणावर मदतकार्य करते. भूकंप, पूर, चक्रीवादळ, त्सुनामी, दुष्काळ यांसारख्या संकटांच्या वेळी रेड क्रॉसचे स्वयंसेवक तातडीने घटनास्थळी पोहोचतात. तेथे अन्न, पाणी, औषधे, निवारा आणि मानसिक आधार उपलब्ध करून देतात. अनेक वेळा अशा परिस्थितीत सरकारी यंत्रणाही अपुऱ्या पडतात, परंतु रेड क्रॉसचे स्वयंसेवक जीवाची पर्वा न करता मदतकार्य सुरू ठेवतात. त्यामुळे लाखो लोकांचे प्राण वाचतात आणि त्यांना नवजीवन मिळते.

आरोग्य क्षेत्रामध्ये रेड क्रॉसचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. रक्तदान चळवळीमध्ये या संस्थेची भूमिका विशेष उल्लेखनीय आहे. जगभरात रक्तदान शिबिरे आयोजित करून लाखो रुग्णांना जीवनदान देण्याचे कार्य रेड क्रॉस करत आहे. आजही अपघात, शस्त्रक्रिया किंवा विविध आजारांमुळे अनेक रुग्णांना रक्ताची गरज भासते. अशा वेळी रक्तदान हे सर्वांत मोठे दान मानले जाते. रेड क्रॉसने समाजात रक्तदानाविषयी जागृती निर्माण केली आहे. 'रक्तदान हेच जीवनदान' हा संदेश या संस्थेने प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवला आहे.

कोविड-१९ महामारीच्या काळात रेड क्रॉसने दिलेली सेवा संपूर्ण जगाने अनुभवली. त्या कठीण काळात लाखो लोकांना अन्न, औषधे, ऑक्सिजन आणि वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात रेड क्रॉसने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. लोकांमध्ये भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण असताना रेड क्रॉसचे स्वयंसेवक धैर्याने काम करत होते. अनेकांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून इतरांचे प्राण वाचवले. महामारीच्या काळात मानवतेचे खरे दर्शन घडवणाऱ्या संस्थांमध्ये रेड क्रॉसचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

भारतात रेड क्रॉस चळवळीची स्थापना १९२० साली झाली. भारतीय रेड क्रॉस सोसायटीने देशभरात विविध सामाजिक, आरोग्यविषयक आणि आपत्ती व्यवस्थापनाचे उपक्रम राबवले आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये आरोग्य सेवा पोहोचवणे, रक्तदान शिबिरे आयोजित करणे, प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देणे आणि आपत्तीग्रस्तांना मदत करणे ही या संस्थेची प्रमुख कामे आहेत. भारतामध्ये पूर, भूकंप, दुष्काळ आणि चक्रीवादळांसारख्या संकटांच्या वेळी रेड क्रॉसने दिलेली मदत लोकांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

महाराष्ट्रातही रेड क्रॉसचे कार्य मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. पूरग्रस्त भागांमध्ये मदतकार्य, आरोग्य शिबिरे, रक्तदान मोहिमा आणि विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित करून ही संस्था समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणत आहे. ग्रामीण भागात प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देऊन अनेकांचे जीव वाचवण्यास मदत होत आहे. आजच्या काळात आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रशिक्षित स्वयंसेवकांची गरज वाढत आहे आणि रेड क्रॉस या क्षेत्रात प्रभावीपणे कार्यरत आहे.

रेड क्रॉसच्या कार्यामध्ये युवकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. महाविद्यालये आणि शाळांमध्ये युवक रेड क्रॉसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सेवा, सहकार्य आणि सामाजिक जबाबदारीची भावना विकसित केली जाते. युवकांनी समाजासाठी काम करावे, रक्तदान करावे, पर्यावरण संवर्धनात सहभागी व्हावे आणि संकटाच्या काळात लोकांना मदत करावी, हा संदेश युवक रेड क्रॉसद्वारे दिला जातो. आजच्या तरुण पिढीमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी ही चळवळ अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

जागतिक रेड क्रॉस दिन साजरा करण्यामागे केवळ संस्थेच्या कार्याचा गौरव करणे हा उद्देश नाही, तर समाजामध्ये मानवतेची भावना रुजवणे हा त्यामागील मुख्य हेतू आहे. आजच्या युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्रचंड प्रगती केली असली तरी मानवी संवेदनशीलता अनेक ठिकाणी कमी होताना दिसते. स्वार्थ, स्पर्धा आणि भौतिकवादाच्या या काळात माणूस माणसापासून दूर जात आहे. अशा परिस्थितीत रेड क्रॉससारख्या संस्था मानवतेचे महत्त्व अधोरेखित करतात.

मानवतेच्या सेवेसाठी आर्थिक संपत्तीपेक्षा संवेदनशील मनाची अधिक गरज असते. एखाद्या संकटग्रस्त व्यक्तीला आधार देणे, भुकेल्याला अन्न देणे, रक्तदान करणे किंवा आपत्तीच्या काळात मदतीचा हात पुढे करणे या छोट्या कृतीदेखील समाजात मोठा बदल घडवू शकतात. रेड क्रॉस आपल्याला हेच शिकवते की, मानवतेपेक्षा मोठा धर्म कोणताही नाही.